
# पणत्या



रघुवीर सामंत

*Moderate & Best--*
**P. Shantaram Tailors,**
Near P. Church, Girgaon BOMBAY.

---

**तुमच्या बबींचें लग्न !—बाबूची मुंज !**
काल कठिण आला असला तरी चिंता मुळींच नको !

---

आपल्याला पेन्शनची सरकारी नोकरी नाहीं म्हणतां ?
पण मग
**आपल्या वृद्धापकाळाची खात्रीपूर्वक तरतूद !**

---

**आपल्या कुटुंबालाहि वक्तशीर पेन्शन
मिळविण्याची सोय !**
सविस्तर योजनांचें माहितीपत्रक मागवा.
११ वर्षांवर लोकाश्रयास व लोकादरास पात्र ठरलेली
**ईस्ट इंडिया इन्शुरन्स कंपनी** (लि.) कलकत्ता.
Chief Agents : Bombay Province.
**VISHWAS & CO**, 180 Girgaon Rd. Bombay.

---

दिवाळीच्या वेळीं कपड्याच्या बाबतींत विरस होऊं
नये म्हणून—
**P. RAMCHANDRA**
**"TAILORS"**
एकवेळच्या अनुभवानें कायमचे संबंध.
**RELE BUILDING, SARKARI TABELA,
GIRGAUM BOMBAY.**

श्रः न. सामंत.

हा प्रदीर्घ कादंबरीमाला लेखनाचा महाराष्ट्रांतील पहिलाच प्रयत्न अनेक दृष्टींनीं महत्वाचा झाला आहे. तींत महाराष्ट्रसमाजाचें वास्तववादी, व्यापक, विविधतापूर्ण चित्र अतिशय जिव्हाळ्यानें व कलाकुसरीनें उभें केलें गेलें आहे. याच दृष्टींनें प्रा. वा. म. जोशी-सारख्या जबाबदार टीकाकारानें— "महाराष्ट्राच्या आधुनिक वाङ्मयीन कालखंडांतील ही अभिनव सामाजिक कादंबरी तिच्या अंगच्या अनेक गुणांमुळें फार वरचें व मानाचें स्थान पटकावील" अशासारखा 'मुंबई आकाशवाणीं' तून रसिक निर्वाळा दिला आहे.

सप्टेंबर १९३९ मध्यें प्रकाशांत आलेलीं त्यांचीं "**आजचीं गाणीं**" हीं गेय गीतें आजच्या समाजस्थितीची व आजच्या समाजभावनांचीं वास्तववादी चित्रें आहेत. त्यांत महाराष्ट्राच्या सांघिक गीतांचा पहिलाच अभिनव प्रयत्न रसिकांस पहावयास मिळेल. या संग्रहांतील '**हुश्शार**' 'व्हडिवाल्या' '**डोलकाठी**' वगैरे कांहीं गीतें त्यांनींच गाऊन, त्यांचें '**हि. मा. व्हॉइस**' तर्फे १९३९ च्या सुरवातीस रेकॉर्डसूहि तयार झाले आहेत.

लघुनिबंध लेखक या नात्यानें श्री. सामंत प्रस्तुत '**पणत्या**' या पुस्तकानेंच प्रथम प्रकाशांत येत आहेत. त्यांतील बहुतेक लेख अप्रसिद्धच आहेत. लेखकाची लघुनिबंध लिहिण्याची ही अभिनव व अगदीं घरगुती स्नेहाळ धाटणी रसिकांना प्रिय होईल अशी खात्री वाटते.

—**प्रकाशक** (नोव्हेंबर १९३९.)



'**शब्दचित्र**' हा नवीन वाङ्मयप्रकार महाराष्ट्रांत प्रामुख्यानें रूढ करणारे '**कुमार रघुवीर**' १९३० सालापासून महाराष्ट्राला सुपरिचितच आहेत. १९३२ सालीं '**हृदय**' हा त्यांचा शब्दचित्रें व लघुकथा यांचा पहिलाच संग्रह प्रसिद्ध होऊन त्यांचें मराठी वाङ्मयांतील मानाचें स्थान स्थिर झालें. '**हृदयां**'तील अनेक शब्दचित्रें आतां शालेय पुस्तकांतूनहि मुलांच्या अभ्यासक्रमांत आलीं आहेत.

१९३४ सालीं '**वाळूतील पाउलें**' हा त्यांचा कलात्मकता व विविधता यांनीं नटलेला दुसरा लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९३५ सालीं प्रकाशित झालेला रुपांतरात्मक गोष्टींचा '**सुरंगांची वेणी**' हा लघुकथासंग्रहहि रसिकांच्या मनांची पकड घेऊं शकला.

त्यानंतरच्या दोनअडीच वर्षांत लिहून तयार असलेली '**उपकारी माणसें**' ही त्रिखंडात्मक प्रदीर्घ सामाजिक कादंबरी, शेवटीं, १९३८ च्या सुरवातीस प्रसिद्धीस आली. '**प्रवासांतील सोबती**' व '**अभ्र-पटल**' हे दोन खंड आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. '**आकाश गंगा**' हा तृतीय खंड लौकरच बाहेर पडेल.

Jacket Printed at Sagar Sahitya Printing Press, Bombay 4.

पणत्या

पारिजात प्रकाशन ९



पारिजात प्रकाशन

# प ण त्या

७

— रघुवीर सामंत

दिवाळी १८६१

**वासुदेव वालावलकर,** बी. एस्सी.
यांनीं **'पारिजात प्रकाशन'** साठीं
७ मॅथ्यूरोड : मुंबई ४
येथें प्रसिद्ध केलें.

( सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन )

डिस्ट्रिब्यूटर्स
श्री. **यशवन्त गोपाळ जोशी**
६२३/१५ सदाशिव : पुणें २

**ज. द. सातोस्कर**
यांनीं **सागर साहित्य छापखाना**
किसन महाल, त्रिभुवन रोड, मुंबई ४
येथें छापिलें.

**किं. १५ आणे**

तीर्थरूप सौ. मावशी व तीर्थरूप काका
या प्रियजनांस —

— रघुनाथ.
१०/११/३८.

वासुदेव व
यांनीं 'पारि
७ मॅथ
गे

किं. १५

श्री. रघुवीर सामंत बी. ए., बी. टी.
यां चीं

## पु स्त कें

प्रकाशित—

१ हृदय ( लघुकथा व शब्दचित्रें )
२ वाळूंतील पाउलें ( लघुकथा )
३ सुरंगीची वेणी ( रूपांतरित लघुकथा )
४ प्रवासांतील सोबती ( कादंबरी )
५ अभ्र–पटल (कादंबरी)
६ आजचीं गाणीं–१ ( कविता )
७ पणत्या ( लघुनिबंध )

छपाईस तयार—

८ आकाश–गङ्गा ( कादंबरी )

कल्पित—

९ तारांगण (चिमकुल्या चांदण्यांचा संग्रह)
१० तांडा ( लघुकथा )

## शालोपयोगी पुस्तकें

छपाईस तयार—

१ वानग्या ( पूर्वार्ध ) : ( हायस्कूलासाठीं स्थूलवाचन )
२ वानग्या (उत्तरार्ध) : ( हायस्कूलासाठीं स्थूलवाचन )
३ 'मी लेखक होणार !—'
( इंग्रजी १ ते ६ वर्गासाठीं मराठी निबंध–मार्ग–दर्शिका)

बदलते देखावे : : १

# रस्त्यांची निवड.

माझ्या लहानपणीं आमच्या शाळेंत आजची नवीन पद्धती तितकी कांहीं रूढ नव्हती. पण जादा उत्साहाच्या प्रदर्शनासाठीं म्हणा, किंवा अगदीं त्यावेळचा अद्यतनपणा दाखविण्यासाठीं म्हणा, मधून मधून आमचे मास्तर प्रश्नोत्तर पद्धतीनेंहि आमच्या अनुभवांना हात घालण्याचा प्रयत्न करीत असत !—अर्थात् त्यांत मंत्रापेक्षां तंत्राचाच अधिक अभिनिवेश असे.

एकदां मराठीचा एक तास चालला असतांना आमच्या मास्तरांनीं मला विचारलें, "मुंबईला विशेष काय पहाण्यासारखं आहे रे ?" --(त्यांना मला वाटतें, 'राणीचा बाग' हें उत्तर पाहिजे होतं. पण त्याचं अर्थात मला कांहीं स्वप्न पडलं नव्हतं ! )—तेव्हां मी त्यावर उत्तरादाखल माझ्या कल्पनेप्रमाणें पटकन् म्हणालों, "रस्ते !"

त्यावर वर्गातील बहुतेक मुलें खदखदां हंसलीं. माझ्या मास्तरनीं तर मला महामूर्खच ठरविलं;...पण आजच्या इतकेंच त्यावेळींही मला वाटत होतं, कीं हा ज्याच्या त्याच्या मताचा—नव्हे मनाचा—

प्रश्न आहे. आतां दुसऱ्या एखाद्यानें ‘ मुंबईतील पोलीसच आम-ल्याला आवडतात ! ’ असें त्या प्रश्नाला उत्तर दिलं असतं तरी, काय बिघडलं असतं बरं ?—

पण नाहीं. पुष्कळच बिघडलं असतं कीं ! आमच्या मास्तरांना आम्हाला ‘ राणीच्या बागे’वर निबंध लिहावयास सांगावयाचं होतं. तेव्हां, माझ्या उत्तरांतील रस्ता राणीच्या बागेकडे जाणें शक्य नसल्यामुळें, निदान त्यांच्या दृष्टीनें तरी, अर्थात् मीच मूर्ख ठरलों.

आज मात्र हें लिहितांना मला समाधान वाटतें आहे कीं, मी उलट त्यांनाच मूर्ख ठरवूं शकत आहे !—

खरेंच, पण ‘ मुंबईतील रस्ते ’ ही माझी केव्हांपासूनचीच मोठी नबळी बाजू ( Weak point ) आहे. त्यासाठीं, माझ्या लहानपणीं, माझे वडील मुंबईस जाऊं लागले आणि ‘पोलीस धरून नेतात ’ असा त्यांनीं मला नेहमीं धाक दाखविण्याचा जरी आटोकाट प्रयत्न केला, तरी ( पोलिसांनीं धरून न नेतां वडील तरी अगदीं सुखरुपपणें संध्याकाळीं घरीं परत येतात, हें अनेकवेळां पाहून ) त्यांच्याबरोबर त्यावेळीं सुद्धां मुंबईस जाण्याचा मी नेहमीच हट्ट धरून बसे.

तेव्हां, शेवटीं तेहि माझी कटकट थांबविण्यासाठीं, कुरकुरत कां होईना, मला बरोबर नेत !—पण मग, ते मोठमोठ्या इमारतींचे मजले आपल्या कामासाठीं खालीं-वर उतर-चढ करूं लागले, कीं मला त्यांचा अस्सा अगदीं राग येई !—धड एक रस्ता ते मला नीट पाहूं देतील तर शपथ !—मी आपला सदाचा हिरमुसला !—



आणि त्याचा परिणाम शेवटीं असा झाला, कीं, मी जेव्हां अगदीं स्वतंत्रपणें मुंबईतून फिरूं लागलों, तेव्हां रस्त्याविषयींचं माझं प्रेम द्विगुणित झालं-किंबहुना शतगुणित व शतविध झालं म्हणणंच बरं !—

आतां कदाचित् तुमचा अनुभवच तुम्हाला सांगेल कीं, रस्त्यांतील जमावांत आपणच सामील होऊन फिरणं, हीहि एक मौज असली, तरी मला तर वाटतं, त्या रस्त्यांतील जमावाकडे दुरून, अगदी त्रयस्थपणें, पहाण्याची मौज तर त्याहूनहि कांही औरच असतें !—मुंबईत बारा महिने राहून कंटाळणाऱ्या व सदा चिरचिर करणाऱ्या कुरकुऱ्या माणसांना तर मी एकदम सांगेन, तसा पुन्हां कधीं तुम्हाला कंटाळा आला, तर आपल्या दाट वस्तींतील खोलीबाहेर या—किंवा ब्लॉक असला तर बाल्कनींत उभे रहा—आणि मग समोर असेल त्या रस्त्याकडे पाहूं लागा !....रेक्लेमेशन, बॅटरी, बँडस्टँड, चौपाटी...कोठेहि जाण्याचा त्रास न पडतां, एका क्षणांत, उष्मा—घाम...सारें तुम्ही विसरून जाल ! आणि असे अगदीं तासचे तास केव्हां निघून जातील याचंहि तुम्हाला भान रहाणार नाही ! (क्षमा करा हं, साधीच गोष्ट—पण कधीं कधीं तीहि लक्षांत येत नसते ! म्हणून जातां जातां सांगितलं आपलं !)

‘ असं असतं तरी काय रस्त्यांत ? ’ तुम्ही म्हणाल ! पण रस्त्यांत काय नसतं तेंच मला विचारा ! म्हणजे काय असतं त्याची लांबलचक यादी देण्याचं तरी मला उगीच कारण पडणार नाहीं.

वेडीं लहान मुलें निरुपद्रवी खेळणीं घेऊन जो आनंद अनुभवतात, तोच आनंद मोठ्या माणसांना असल्या गजबजलेल्या रस्त्यांमध्यें सांपडतो !

म्हणजे, रस्त्याकडे पहाण्याचे मोठ्या माणसांनींच 'सर्व हक्क स्वाधीन' ठेवलेले आहेत, असेंहि माझं म्हणणं नाही. त्या आनंदांत, मला वाटतं, शहरी वस्तींतील सारेच प्राणीमात्र भागीदारी करतांना दिसतील. . 'ढुम्‌ढुम्' ऐकून लहान मुलें ग्यॅलरींत धांवत येतात -- (मोठीं माणसेंहि, 'अरे काय उगीच धांवतां?' असें त्यांना दरडावत त्यांच्या मागून लगबगीनें येतातच म्हणा!)-- हें आपण नेहमी पहातोंच. अनुकरणशील स्त्रीसाम्राज्यांतील नवनवीन फॅशनांचे प्रदर्शन, प्रचार, प्रसार, मला वाटतं, खिडकी--बाल्कनी किंवा ग्यॅलरी--रस्ता यांच्या मध्यस्तीनेंच अधिक होतें!

फार काय, मी प्रत्यक्ष पाहिलेली गोष्टच सांगतों तुम्हांला!-- आजच्या मुंबईतील पाळीव जनावरें सुद्धां रस्त्यांतील गंमत निरखून पहात, 'जिवाची मुंबई' करतात--

मांजरांना कांहीं मी पाहिलेलं नाही असं रस्त्याकडे पहात असतांना! पिंजऱ्यांतील राघू तर शिकविलेलं तेवढंच बोलतो व त्याला खायला घालतात तेवढेच पदार्थ व तेवढेच लोक पहातो म्हणे!--पण आमच्या समोरच्या उंच हिरव्या इमारतीच्या, चौथ्या मजल्यावरील कोंपऱ्यावरल्या खोलीच्या खिडकींत, एक पाळीव पांढरा कुत्रा मला नेहमीं दिसतो; तो खिडकी जवळच्या खुर्चीवर गंभीर चेहरा करून बसतो, आपले पुढले पाय जाळीदार पडद्याखालच्या आडव्या पितळी गजाखालीं ठेवतो; त्या गजाखालच्या फटींतून मान बाहेर काढतो; आणि मग...अगदीं विहंगम दृष्टीनें, खालच्या रस्त्यावरील इवलाल्या माणसांची चोहोंबाजूंची वर्दळ,



मानेला मधून मधून फडक्यांच्या प्रदर्शनांतील बाहुल्यांना मिळणाऱ्या विजेच्या धक्क्याप्रमाणें झटके देत, मोठ्या दिमाखानें व अक्कलहुशारीनें तासचे तास पहात असतो!--

ही कांहीं थाप नव्हे! शंभर टक्के खरी गोष्ट आहे!--

मग सांगा--काय बरें पहात असेल तो तेथून??

तें कांहीं कां असेना!--त्या मुक्या जनावराची मानवी कोलाहलाविषयींची ती कुतूहल--दृष्टी व तासचे तास टिकणारी त्याची ती चिकाटीची तपश्चर्या पाहूनच, प्रथम माझी दृष्टी, खऱ्या कुतूहलानें रस्त्याकडे वळली!--आणि तेव्हांपासून मी रस्त्याचा एक निस्सीम-भक्त झालों आहें. मुंबईचा रस्ता म्हणजे आतां माझं मोठेपणचं छोटं पण निरुपद्रवी खेळणंच झालं आहे!--

त्यांत पहिला आणि महत्त्वाचा फायदा माझ्या लागलीच अनुभवास आला आहे; तो असा कीं, असं खिडकींत किंवा ग्यॅलरींत उभे राहून रस्त्याकडे पहाण्यांत, स्वतः पूर्ण निश्चल राहून, चालत्या बोलत्या व स्वतःच्याच लहानसहान सुख-दुःखांत गढलेल्या समाजाचे आपल्याला स्वतःच्या दृष्टीनें अगदीं निर्विकार, त्रयस्थ निरीक्षण करतां येतें--

मग 'बालादपि'प्रमाणें 'श्वानादपि' (संस्कृत चुकत असलं तर चुकूं द्या माझं) आपल्याला कांहीतरी घेतां येतं की नाही सांगा बरं?--

तरी पण असं म्हणतात, कीं, पशू नैसर्गिक परिस्थितीला हतबलपणें मान वांकवतो; उलट मनुष्य आपल्या अंगच्या पुरुष-

प्रयत्नानें नवीन नवीन परिस्थिती निर्माण करून, आपल्याला फायदेशीर होईल अशीच या जगांत वाट काढतो !—

आणि खरंच आहे तें !—कारण नाहीं तर पहा ! त्या कुत्र्याचं आणि माझं घर—एकाच लहानशा रस्त्यावर अगदीं समोरासमोर ! —पण मग त्याला कांही मोठ्या रस्त्यावर रहाणाऱ्या आपल्या एखाद्या मित्राकडे जाण्याची कधीं बुद्धी सुचली कां ?—मुळींच नाहीं. उलट मी मात्र माझ्या एका दोस्ताकडे (हा माझा पूर्वी दोस्त नव्हता म्हणा; आतांच झाला आहे) मोठ्या रस्त्याच्या निरीक्षणासाठीं यापुढें नियमानें नेहमी जाऊन बसूं लागलें आहे कीं नाही ??—

हो !—या माझ्या दोस्ताचं ठाकुरद्वारला नाक्याजवळच घर आहे !—त्याच्या खिडकींत उभं राहिलं, कीं एका बाजूस फणसवाडीपर्यंत दृष्टी पोहोंचते, तर दुसऱ्या बाजूस पहातांच, धांवत्या ट्रॅम–बस-मोटारी अंगावर खेळविणाऱ्या गिरगांवरोड पलीकडील, थेट चर्नीरोड स्टेशनाजवळच्या आगगाडीच्या फांट्याचीहि कल्पना करता येते.

आणि अगदीं करमेनासं झालं म्हणजे या दक्षिणी वस्तीच्या जिब्राल्टरवर जाऊन तासतासभर उभे रहाण्याचा मोह मलाहि अगदीं आवरेनासा होतो !—

तुम्ही येथें मला म्हणाल 'दक्षिणी वस्तीचाच जिब्राल्टर कां पसंत केला ?' त्याचें कारण, मला वाटतं, माणसाला नैसर्गिकपणेंच आवडणारी आपुलकी !—पहावयाच्या रस्त्यांची निवड याच पूर्वापार चालत आलेल्या आपुलकीच्या तत्वांवर करावीसें मला तरी वाटते !—



असा विचार करतां करतां, माझ्या मनांत एक मोठा संशय डोकावतो. हो, लंडनच्या रस्त्याकडे पाहून माझी करमणूक होईल कां ? मला कांहीं खात्री देता येत नाहीं !—अनेक वर्षांनी अवतीर्ण होणाऱ्या शेंडेनक्षत्राकडे पहातांनाची भांबावलेली मानवी नजरच त्यावेळीं माझ्या डोळ्यांत स्थिरावेल मला वाटतं.

पण उलट माझ्या या ओळखीच्या वातावरणाकडे पहातांना मला अढळ ध्रुवाकडे पहातांनाची आपुलकीच वाटेल !—

बदलते देखावे : : २

## चष्म्यांची निवड.

पण मग, कमी दृष्टी असणारे लोक किंवा जाड भिंगांचे चष्मे वापरणारे लोक येथें मला पटकन् म्हणतील, 'कायहो—रस्त्यावरील असल्या या आधीच्याच गोंधळी कारभाराचें दृश्य, आम्हाला तर अगदीं साखऱ्यासारखं दिसेल. मग तिकडे पहात बसण्यांत तरी काय मौज आहे?'

पण त्यांचीच गोष्ट कशाला? माझा इतक्या वर्षांचा अनुभव असा आहे कीं,—अगदीं उत्तम दिसतं असं छातीवर हात (?) ठेऊन सांगणाऱ्या लोकांना सुद्धां, आपापला एक अदृश्य असा चष्मा असतो. त्यामुळें त्यांना कांहीं दृश्यें तेवढींच अस्पष्ट दिसतात, कांहीं वस्तुस्थितीहून जरा निराळीच वाटतात, कांहीं तर साफ दिसतहि नाहीत.

असल्या या अदृश्य चष्म्यांची दुसरी एक गंमत आहे; ती अशी कीं, त्यामुळें त्यांच्या मालकांना आपापल्या पद्धतीनें रस्त्यावर स्पष्ट दिसणाऱ्या वस्तूंप्रमाणेंच स्पष्ट दिसण्याच्या वेळाही बदलतात!—



एखाद्याला आपल्या अदृश्य चष्म्यामुळें रस्त्यावर कितीहि गजबजाट असला, तरी पुरुष किंवा लहान मुलें म्हणून एकही दिसणार नाही. यांच्यापैकीं काहींचा चष्मा तर याहूनहि सूक्ष्मदर्शक असतो. त्यांना वरील यादीबरोबरच रस्त्यावरील साऱ्या वृद्ध स्त्रियाहि दिसत नाहींत; पण बाकी सारं स्पष्ट दिसतं!—काहींना रस्त्यामधले सकाळचं चांगलं दिसत नसलं तरी दहा साडेदहाला सर्व बिंदुन् बिंदू स्वच्छ दिसतं!...तीच गोष्ट संध्याकाळीं साडेचार पांचच्या दरम्यानच फक्त स्पष्ट दिसणाऱ्या चष्मेवाल्या तडफदार तरुण लोकांची!—

मला स्वतःला म्हणाल तर असा ठराविक भिंगांचा चष्मा कांहीं मुळींच आवडत नाहीं! याचं कदाचित हेंहि कारण असेल कीं, फार लहानपणापासूनच मी स्वतःचा चष्मा वापरूं लागलों आहे. तो वाढत्या वयाप्रमाणें आतांपर्यंत दोन—तीनदां बदलावाहि लागला आहे! आणि अजूनहि दोन—तीनदां बदलावा लागेल अशी भीती वाटते!...पण एवढं खरं, कीं ठरावीक गोष्टींच स्पष्ट अस्पष्ट, ठरावीक वेळींच स्पष्ट—अस्पष्ट, असे माझ्या तरी चष्म्याचे कांहीं चोचले नाहीत बुवा! आणि म्हणूनच, केव्हांही रस्त्याकडे मी पाहिलं, कीं साऱ्या गोष्टी मला स्पष्टपणें दिसतात. व साऱ्या गोष्टींकडे, साऱ्या देखाव्यांकडे, अगदीं स्पष्टपणें पहावसं मला वाटतं!

आतां हा चष्मा कितीही स्पष्ट दृश्यें दाखविणारा असला तरी अशा कहीं रस्त्याच्याच आयुष्यांत वेळा असतात, कीं, त्यावेळीं तेथें स्पष्ट दिसणारीं दृश्येंच मुळीं अगदीं तुरळक असतात—अगदींच एकप्रकारचीं असतात!

उदाहरणार्थ, सकाळीं नऊ साडेनऊच्या सुमारास केवळ ऑफिसची घाई होऊन ट्रॅममागें धांवणारे, किंवा नाक्यानाक्यावरील पांढऱ्या आडव्या हाताकडे पाहून (जणूं पांढऱ्या पायाच्या पोलिसांना मनांत अगणित शिव्या देत) सायकलीवरील सर्कस करणारे लोकच स्पष्टपणें तुम्हाला जास्त दिसतील ! दुपारीं बारा ते दीडच्या दरम्यान जेवणाच्या डब्यानीं भरलेल्या डोक्यावरील मोठ्या थोरल्या घेराच्या पाट्या पेलत, धांपा टाकीत, घाम निथळत, लगबगीनें धांवणाऱ्या घाट्यांचीच रांग तुम्हाला दिसेल. रात्रीं साडे अकरानंतरच्या निर्जन रस्त्यावर (पण मग त्याला रस्ता म्हणायचं कशाला मी म्हणेन ?–) क्वचित् क्वचित् मलमल सदरेवाले, तेल चोपडलेले, खूप दाट राखलेल्या केसांचा मधोमध भांग पाडलेले, कधीं बरळत तर कधीं 'पिचिक्' थुंकून अचकट विचकट बोलत, घोळक्यानें अगर एकाकीच जाणारे न्यारे लोक आपल्याला दिसतील.

या रस्त्यांच्या आयुष्याप्रमाणेंच, माणसाच्या आयुष्यानुसारहि रस्त्यावरील दृश्यें बदलतील. आपल्या विद्यार्थी दशेच्या वेळचे गिरगांवांतील कित्येक निर्जन रस्ते आतां साफ बदलले, मोठे झाले, गजबजले, असें माझे वडील म्हणतात. पण माझ्याच छोट्या आयुष्यांतील विद्यार्थीदशा आठवून, त्या वेळच्या नुसत्या गिरगांव रोडचीच आतां एका तपानंतरच्या आजच्या गिरगांवरोडशीं तुलना केली तरीहि किती आश्चर्य वाटतं ? —मुगभाटसमोरील खुल्या मांगलवाडीच्या ओसाड मैदानावरील, पूर्वीचीं पडदे लावून स्थापलेलीं प्रदर्शनें जाऊन आतां तेथील गजबजाटांत हजारों जीव जगतांना पाहून मनाला विस्मय वाटतो !—



पण हीं सारीं एकाकीं दृश्यें म्हणजे कांहीं रस्त्याची प्रतीकें नव्हत. रस्ता म्हणजे रस्ता !–दुसरं कांहीं नाहीं !–म्हणूनच मी म्हणतों, कीं तेथें काय आढळतं याची यादी करण्याऐवजीं काय आढळत नाहीं याची यादी करणं फार सोपं होईल.

बऱ्याच दिवसांच्या अनुभवानंतर मला आतां वाटतं, कीं, रस्त्याकडे पहात बसावयास आयुष्यांतील सर्वांत उत्तम वेळ म्हणजे बाल्य व दिवसांतील उत्तम वेळ म्हणजे संध्याकाळ !

आपापल्या कामधंद्यामागें धांवणाऱ्या माणसांनी गजबजलेला, असंख्य आवाजांनी व दृश्यांनीं भरलेला, सकाळीं नऊ दहाच्या सुमाराचा रस्ता–किंवा रात्रीं प्रत्येकजण आपापल्या घरीं पोंचल्यानंतर, नुसत्या दिव्यांच्या लखलखाटांत चकाकून, आरासारखा शांत पडल्याप्रमाणें किंवा सरपटल्याप्रमाणें भासणारा व दिसणारा निर्जन, निःशब्द रस्ता !...एखाद्यावेळीं कांहीं मिनिटें तिकडे कुतूहलानें पहावयास मौज वाटेल; जास्त नाहीं ! अशा वेळीं खिडकींतून रस्त्याकडे पहाण्याइतकीच रस्त्यांतून एखाद्यावेळीं एकटंच फिरण्यातहि मौज असते. हें विधान मला स्वानुभवानें खरं वाटतं—

पण पहिल्यावेळीं साधारणतः आपणहि इतरांप्रमाणेंच पोटामागें धडपडत असतों. तर दुसऱ्यावेळीं साधारणतः आपणहि इतरांप्रमाणंच झोंपलेले असतों. त्यामुळें नेहमी तसं पहाणं आप-

त्याला शक्य नसतं !...आणि म्हणूनच मी म्हणतों, कीं, रस्त्याकडे तासतास पहाण्यास मौज आणणारी सर्वांत उत्तम वेळ म्हणजे संध्याकाळ !

त्यावेळीं माणसं, माणसं असतात !... दिवसभर कामकाज करून, जरा हायसं वाटण्यासाठीं तीं निश्वास टाकीत असतात; एकमेकांच्या निर्हेतुक सुखदायक सहवासाचा तीं आनंद आस्वादित असतात. किंवा आपल्या घरच्या अगर स्नेह्यासोबत्यांच्या घरगुती वातावरणांतील आनंदाच्या कल्पनांमध्येंच तीं गढलेलीं दिसतात. त्या त्यांच्या चळवळींत यांत्रिक धडपड तशी प्रामुख्यानें नसतेच ! संथपणा, आनंद, करमणूक या हेतूंच्या खेळकर दृष्टीनेंच त्यांची साधारणत: हालचाल चाललेली असते ! त्यांत एकप्रकारची बालिश बेफिकीरी असते, मला वाटतं !...

रूसोच्या कोणत्यातरी एका सहज आठवणाऱ्या वाक्याचा येथें उपयोग करून म्हणावयाची मला परवानगी दिलीत, तर मी म्हणेन, "त्यावेळच्या रस्त्यावरील हालचालींना मुख्य चालना एकाच दृष्टीची असते ... Not to gain but to lose time!"





# भावनांच्या हालचाली.

संध्याकाळीं रस्त्याकडे पहाण्याची दुसरी एक गंमत म्हणजे तिथला त्यावेळचा जमाव अगदी विविध असतो. त्या मानवी दृश्याला आपण म्हणायचं तरी काय, हा आपल्याला मोठा प्रश्न पडतो. कोलाहल करणारा, निरनिराळ्या आकांक्षांनीं भावनांनीं चलनवलन करणारा, गोंधळी जमाव ( crowd ) म्हणावं तर त्यांत निरनिराळे घोळके, समूह दिसतात. बरं, एके ठिकाणीं यदृच्छया आलेले निरनिराळे घोळके म्हणावं तर अगदीं स्वतंत्रपणें संचारणाऱ्या व्यक्तिहि त्यांत दिसतात. आणि या साऱ्यांच्याच भावना खेळकर, अनिर्बन्ध, बालिश आहेत म्हणावं तर त्यांच्या त्या उल्हसित मन:स्थितीच्या भांडवलावरच, साऱ्या दिवसांतील पोटाचा धंदा उरकून घेणारीं, केवळ विचारीं, सौदे करणारीं, धंदेवाईक मंडळीहि तेथें आढळतात !—

तो कोपऱ्यावरील लालबुंद इराणी पहा ! कसा गल्ल्यावर बसून हसतमुखानें पैसे देत–घेत आहे तो !...त्याच्याकडे कोणी उण्णानें उण्ण मारण्यासाठीं चहा घेत आहे, तर जीव थंड करण्या-

साठीं, कोणी गवताच्या नळीनें ग्लासातील कोल्ड्रिंक किंवा हातां-तील चपट्या चमच्यानें समोरील 'अर्धा प्लेट' मधील नारिंगी आइस्क्रीम घशाखालीं घालत आहे!...सदऱ्या-टोपीनेंच फिरणाऱ्या त्या कुटुंब-वत्सल माणसाबरोबर, इराण्यापलीकडील निरुंद दुकानावर बसलेली म्हातारी भाजीवाली, दिडकींत आलें-मिरची-कोथिंबिर घालताना केवढी काटकसर करीत आहे तें पाहिलंत ना? तो गृहस्थहि दिडकी तराजूजवळ टाकून चार कढीलिंबाच्या व कोथिंबिरीच्या काड्या आणि तीन चार जादा मिरच्या उचलून पिशवींत हळूच कोंबत आहे....अलीकडच्या त्या नाक्याजवळ तो फूलवाला व त्याची फटाकडी बायको, फुलें व हार बांधून देत, आजची भाविकपणाची गुरुवार-गर्दी, किफायतशीर करीत आहे!... पण त्याच घोळक्यांत, पाठीमागें जणूं आपल्या पाळीची वाट पहात उभा असलेला तो पोरगेलासा किरकोळ पांढरपेशा मनुष्य, फुलवालीच्या हातांतील हाराकडे पहात आहे कीं त्या धांदलींत, कपाळाकडे सरकणाऱ्या तिच्या चेहऱ्याजवळील केसांच्या बटांकडे पहात आहे, हें तुम्हाला कांहीच नक्की सांगतां येणार नाहीं!... हातांत चामड्याची ब्रीफकेस घेऊन, हा खाली बुटाखुटांत गडबडीनें चालणारा प्राणी पहा!-इन्शुअरन्स एजंट तर नसेल ना तो? असला तरी दुर्दैव बिचाऱ्याचं! यावेळीं नवीन धंदा होण्याऐवजीं पूर्वी इन्शुअर केलेले लोक, चुकून या वर्दळींतील अपघातांत सांपडून, उलट त्याच्याकडे पैसे मागा-यलाच येतील.

पण ही धंदेवाईक मंडळी सोडली तरी तेथील इतर अथांग



मनुष्य-सागराचा, त्यांच्या मनाचा, त्यांत त्यावेळीं तरंगणाऱ्या भाव-नांच्या हालचालींचा, आपल्याला ठाव सांपडणं मुष्कीलच दिसतं. सारी आपली गडबड-घाई!-जो तो आपलंच तट्टू पुढें सारीत आहे!

अगदीं एकेकटे किंवा मधून मधून दुकली तिकलीनें चाल-लेले ते प्राणी पहा!... तुम्हाला त्यांचा संशयसुद्धां येणार नाहीं. एकदा खरोखरीच तुमचा दोस्तहि असेल....पण तेच आतां रस्त्यांतून चालले आहेत ना....झालंच मग! त्यांच्या अंगांत वारं आलं आहे. पहा त्या शेजारच्या एकट्या दुकट्या मुलीला कसा जाणूनबुजून धक्का देत आहेत-तो पलीकडचा तर तुमच्या अड्यांच्याच प्रेमवीराप्रमाणें तिला भर रस्त्यांतच नायिका करून म्हणतो आहे-'चल ये सजणे गुंफू हार'....बाकीचे आपल्याच मनांत दंग...हा रस्ता विसरून, पाहिलेल्या साऱ्या सिनेमा नाट-कांची उजळणी करीत, एखाद्या ब्रह्मचाऱ्यानें ब्रँडीची बाटली झोकल्याप्रमाणें साष्टांग नमस्कार घालत हा चालणार! पण तिला कांही जमुना जळी खेळ खेळायचे नसतात!-मध्यें बिचारीचा उगीच कोंडमारा! तिरस्कारानें त्याच्याकडे व भोवतालच्या साऱ्याच गजबजाटाकडे पहात, जीव मुठींत धरून ती रस्ता पुढें काटूं लागते!—

आतां जरा सहजपणें...रस्त्यांतून चालणाऱ्या प्रत्येक जोड-प्याकडे दृष्टी टाका. नवरा तरतरीत तर बायको, हातापायाच्या काड्या असलेल्या मुलाला घेऊन चाललेली, फिकी म्हातारी

तरुणी,... तो नवरा उंच, धडधाकट, नीटस तर बायको ठेंगू, काळी, साधारण अशी तशीच; ती सुंदर तरुणी पहा!... तो किरकोळ, फोड्यातोंडाचा तिच्याबरोबर चालणारा काळा मनुष्य तिचा नवराच असेल तर तिचं आज दिसणारं हें सौंदर्य (बिचारीला तें जन्मभर लाभो!) किती दिवस टिकणार आहे, कोणास ठाऊक?... एवढ्या साऱ्या लांबलचक पसरलेल्या हालत्या देखाव्यांत, तें समोरून आतां चार पांच मुलांच्या लटांबरांसह आपल्या जवळ येणारं एकटं जोडपंच काय तें एकमेकांना अनुरुप दिसत आहे. बाकी सारीं येथून तेथून विजोड जोडपींच!—आणि ती केशरी फ्रॉक घातलेली, चालतांना मध्यें मध्यें लुडबुडणारी, ठुसक्या बांध्याची, त्या अनुरुप जोडप्याची छकुली!... कशी गोड दिसते आहे नाहीं? पण मग ती वर्षावर्षांच्या अंतराचींच दिसणारीं, सोबत चालणारीं चार मुलें, शेवटचं पांच सहा महिन्याचं तिच्या हातांतील माकडटोपी घातलेलं मूल व तिचा किंचित फिका दिसणारा चेहरा पाहिला म्हणजे मग पतिराजांना स्नेहपूर्वक कांहीं तरी कानांत सांगावंसं वाटतं बुवा! 'कवें'—पण नको!—तो विचारील—'तुला काय अधिकार? माझी जन्माची हक्काची बायको आहे ही!'

गोल पातळें, शेपटे व रंगीबेरंगी साड्या नेसून हसत खेळत जाणारा, तो रस्त्यापलिकडच्या बाजूचा, कॉलेजची पायरी ओलांडूं इच्छिणाऱ्या किंवा ओलांडलेल्या मुलींचा खेळकर घोळका दिसला कां?—पहा! त्यांतील कांहींना तें गोल पातळ शोभतच नाही, तर कांहींना आंबाडाच बरा दिसला असता; पावडरीच्या बाबतींत सध्यां आपण न बोललेलंच बरं!... पण हें सारं सांगणार कोण त्यांना?...



सौंदर्यासाठीं नाविन्य जरूर असावें. पण केवळ नाविन्यामागे लागून असलेलें सौंदर्य कमी करण्यांत काय अर्थ आहे मला समजत नाही.

त्यांच्या पावलावर पावलें टाकून चालणारे ते आजचे जवानमर्द तरुण वीर पाहिलेत कां? त्यांचे बहुतेकांचे पुढल्या घोळक्यांतील बहुतेकींवर प्रेम असेल. पण कोणाचें कोणावर तें त्यांचे त्यांनाच नक्की सांगतां येणार नाही मात्र! आणि प्रेमासाठीं कसला लहानसा त्याग करण्याची पाळी आली तर? आणि केलाच तर ब्राऊनिंग कवीच्या 'Glove' मधील त्या सरदाराचीच बहुतेकांची स्थिती होईल. तेवढें धैर्यहि त्यांच्यात मिळेल अशी खात्री नाही. एवढंच कशाला?....साधें प्रेम साध्या शब्दांतहि व्यक्त करण्याची कोणाची ताकद होणार नाही. कंकणाप्रमाणें भाषा शिकून पत्रें लिहितील. आणि तीं सुद्धां शक्यतर निनांवी!—हे समूहासारखे दिसत असले तरी त्यांना जमाव म्हणण्यास हरकत नाही. कारण तेथें जमावनीतीच राज्य करीत आहे.

या उलट बाजूनें येणारे ते दोन प्राणी पहा. एक कानावर पांढऱ्या केसांचे पुंजके वाढलेला, किंचित् पोंक आलेला, मधून मधून चष्म्याच्या खिळखिळ्या काड्या पुन्हां नाकाकानांवर सावरून ठेवणारा, साठी उलटलेला वृद्ध!..तर दुसरा नुकताच पंचविशींत पाऊल टाकणारा उमदा तरुण! रस्त्यांतून चालतांना दोघेहि यदृच्छयाच जवळ जवळ आले असतील!—पण आपण आतां पहात आहोंत तींच दृश्यें पहातांना, त्यांच्या मनावर

त्या साऱ्यांच्या होणाऱ्या परिणामांत किती अंतर सांपडेल आपल्याला?

एक आयुष्यांतील सारे भोग भोगून, बदलणाऱ्या काळाकडे बेफिकीरीनें व कांहीशा तुच्छतेनें पहात असेल;—बर्क म्हणतो त्याप्रमाणें पूर्वींचे दिवसच चांगले ठरवून, आजच्या या बजबजाटावर मनांत व जनांत ताशेरे झोडीत असेल!.. तरुणांपेक्षां या बदललेल्या जगाची यालाच जास्त कल्पना होत असेल. एकदां केव्हांतरी समाजांतील आपली पदवी ठरवून तिच्या आसऱ्यानेंच आतां आजहि, बदलता काळ, उगवती पिढी, साऱ्यांना तो एकदमच क्षुद्र ठरवीत असेल.

आणि हा दुसरा—बिचारा जगाच्या ओघाला धरून पुढें चालण्यासाठीं—प्रत्येक क्षणीं डोळ्यांत तेल घालून, विचार करून, धीर धरून, पुढील अस्पष्ट, अदृश्य मार्ग आक्रमीत असेल! ना त्याला स्वतःच्या संपत्तीचा पाठिंबा, ना सामाजिक स्थानाचा उपजत पाया. प्रत्येक क्षणीं—आयुष्यांत व मनांत दोन्ही ठिकाणीं-चालू असलेला एकचएक धकाधकीचा जमाना!—पण तो चढाऊ वृत्तीचा असला तर—त्याची आशावादी धडपड पुढें चालूच असेल!—

पण थांबा—जवळपासची मुलें गॅलरीकडे धाऊं लागलीं. बँडचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्या तरुणाच्या अगर म्हाताऱ्याच्या मनांतून आपली दृष्टी काढून घेतली पाहिजे आपल्याला!—कारण तो वर घोडा, सुवासिनींच्या गराड्यांतून आपल्या बाजूस



येत आहे. रंगीबेरंगी सौभाग्यलेण्यांत त्या आपल्याच तोऱ्यांत धिम्मी चाल चालत आहेत. आणि तो घोड्यावरचा वर तर टप्या-टप्यानें प्रांत पादाक्रांत करीत चालणाऱ्या शिकंदराच्या मनःस्थितींत आहे!...

अकारण मी जरा रस्त्याच्या उलट्या बाजूकडे पाहिलें. तिकडून घोळका, धूर, मडकें—पण नको; तुम्ही तीच सुखदायक बाजू पहा. व पाहिजे तर डोळे मिटून खुर्चीवर पडा. हे सारे धांवते, वायुवेगाचे चित्रपट आहेत असेंच तुम्हाला दिसेल! क्वचित् मनाला पिळवटविणारे विषम देखावेहि येथें दिसतील! हो, कोठें स्थैर्य म्हणून आढळणार नाहीं. पण तें साहजिक आहे. येथें सारा विमान वेग चालू आहे! नुसती गडबड—घाई, गिल्ला—गोंधळ—

पण स्वकार्यरत, स्वसुखदुःखमग्न माणसांची रांग,... घोडे मोटारी,... धांवत आहेत!— आणि त्या साऱ्या दृश्याकडे पहातांना आपण खिडकींत अगदीं निश्चल बसूनहि, स्वतःच जगू भरधांव धांवत असल्याचा भास होईल. तेथें साऱ्या दृश्यांचें एकदम आकलन करावयास लागणारें स्थैर्य, स्तब्धता नाहीं—साधी बैलगाडीची दुडकी चालहि नाहीं!—

पण अशीच एक थेट निराळी मनःस्थिती निर्माण करूनहि रस्ता न्यारी मौज आणूं शकतो! नाहीं कां?— आणि म्हणूनच रस्त्याकडे पहात बसणें मला फार आवडतें.

---

# खोल दडलेला इतिहास

माणसाच्या मनाची गंमत पहा !

अगदीं गजबजलेल्या शहरी रस्त्याचं, त्यांतील मानवी जनसंमर्दाचं, तेथील भरधांव धांवणाऱ्या मोटारी—गाड्यांचं प्रत्यक्ष दृश्य अगर मनोमय कल्पनाचित्रसुद्धां अनुभवतां अनुभवतां एकदम एक चमत्कार होतो ! आणि आपल्या मनाची उडी, वेगवान् यंत्रावरून धिम्या दुडक्या चालीच्या खेडवळ बैलगाडीकडे पडते.

हा एक चमत्कार तर खराच; किंचित् आश्चर्यही वाटतं त्याचं ! — पण तें सारं साहजिकहि आहे ! — माणसाच्या मनाची ओढ, निसर्गतःच, मानवी समाजाच्या अगदीं बाल्यावस्थेतील अनुभवाकडे आहे. Primitive things readily touch the human heart ! —

आणि आजच्या घटकेला यांत्रिक प्रगतिपर सुधारलेल्या समाजाचे आपण घटक आहोंत ना ! पण प्रत्येक पावला—पावलाला आपण असलंच सिंहावलोकन केलं तर ?



तर आपल्या दिवाणखान्यांतील विजेचं बटण दाबून चक्क प्रकाश पडला, कीं क्षणभंगुर ठिणगी पाडणारी रानटी गारगोटी-लोखंड-कापूस यांची चकमक किंवा दोन समिधांवर पेटणाऱ्या वेदकालीन यज्ञाची आठवण होईल ! — गजबजलेल्या चाळीच्या नळावर नेहमी चालणारं भांडण पाहून,... बाजूच्या प्रवाहावर एकाकी उभ्या असलेल्या काल्पनिक तरुण स्त्रीच्या हातांतलि मातीचा 'घट भरे प्रवाही बुडबुडुनी !' असं तांब्यांसारखं मोहक चित्र आपल्या डोळ्यापुढं उभं राहील. शहरी गिरणींत सडलेल्या तांदळांच्या पोत्याची शेजारच्या वाण्याच्या दुकानीं आण्या दोन आण्यासाठीं घासाघीस करीत असतां, बैलामागें जमिनींत रुतून चाललेला लांकडी नांगर अगर कापणीच्या वेळचे इतिहास-काळांतलि 'भल र दादा भलगडि दादा' आपल्याला आठवेल !... तकाकणाऱ्या माशांची मासळीबाजारांतील पाटी पाहून, अफाट सागरांत ढकललेल्या एकाकी होडीवर उभे राहून हातांतलि जाळं फेंकणाऱ्या किंचित् वांकलेल्या कोळ्याचं, ... क्षितिजाच्या पार्श्वभूमिवर उभं रहाणारं चित्र आपल्या डोळ्यांपुढं येईल !... नेहमीच रात्रभर प्रकाशित असलेल्या मुंबईच्या रस्त्यामधून जातां जातां, ... निबिड, भयाण, किर्र, निर्जन ... रानांतलि, अगदीं दूरवर (कदाचित् झोपडी असेल अशी कल्पना करून देणाऱ्या) एकाकी मिणमिणत्या दिव्याची आठवण होऊन, आपल्या अंगावर क्षणभर कांटा उभा राहील !...

तुमची कधीं अशी मनःस्थिति होते का? माझी तरी पुष्कळदां होते! ...
आणि मग मनाची समजूत करण्यासाठीं मी निरनिराळ्या प्रकारें विचार करूं लागलों म्हणजे मला त्याचं थोडेसं स्पष्टीकरणही आढळतं!

ही मानवी उपजत बुद्धीच (Instinct) कल्पनेचा खेळ करीत असते, मला वाटतं! ... आणि ... निरनिराळीं कल्पनेंत तरंगणारीं व त्यावेळीं क्षणभरच अगदीं विरुद्ध भावना निर्माण करणारीं हीं तिच्या हालचालीचीं दृश्य साधनें (Emotions) होत. आपण सामाजिक धडपडीनें बदलत आलों; आजच्या घटकेप्रत एवढा मोठा प्रवास करून इतका पल्ला गांठला, हें खरं!— पण मग, मागील इतिहासाचा हा अवशेष आपल्या मनांतच इतका अगदीं कायम ठाण देऊन बसला आहे, कीं— तोच कधींकधीं एकदम जागृत होऊन आपल्याला असं आश्चर्यचकित करतो.

पण हीं अशी एकाकी मनोमय दृश्यें, ... राग, कुतूहल, भय, प्रेम असल्या कांहीं विविक्षित भावनांभोवतीच तेवढीं कां, उभारलीं जातात? ही अंतःस्फूर्ति सामाजिक दृष्टीची नसते याचं कारण?...कारण आपण अजून शॉचीं 'अति माणसें' झालेलो नाहीं. त्याला अगणित काळ अजून पुढें लोटावा लागेल. त्यावेळीं अशा उपजत बुद्धीनेंच नीति, अनीति, वगैरे विषयांचे विचार, भावना आपल्या मनांत डोकावतील कदाचित्! त्यावेळची ही



मानवी उपजतबुद्धि (Instinct) सामुदायिक, सामाजिक (Social) स्वरुपाची होईल.

पण असल्या गोष्टींबाबत उगीच स्वैर कल्पना करीत बसण्यांत अर्थ नाहीं. यंत्रावर अधिष्ठित असं व पूर्वीपेक्षां बऱ्याच प्रमाणांत सामुदायिक पद्धतीवर चालल्यामुळें सुलभ वाटणारं आपलं आधुनिक आयुष्य असेंच पुढं चालून प्रगतीला पोहोचेल, कीं आपण पुन्हां मागे पावलें टाकीत त्याच पूर्वीच्या रानटी परिस्थितीकडे जाणार ... कोणास ठाऊक?

या विचारसरणीला कांहीं बोलघेवडे "प्रतिगामी, शेळपट" अशी ओरडत करत हंसतील! हंसोत बापडे!— पण मग ... म्हणूनच आपल्या मनाचा हा असा पुढल्याप्रमाणें मागलाहि क्षणिक प्रवास चालतो! हो, त्यामुळेंच भुर्कन् निघून जाणाऱ्या मोटारी, ड्रायव्हरशिवायहि चालूं शकण्याची आपल्या मनांत जशी कल्पना येते,... तशीच एकदम दुडक्या चालीनें चालणारी बैलगाडीहि आपल्यापुढे उभी रहाते व या दोन्ही पुढल्या मागल्या कल्पनाचित्रांनीं आपल्याला सारखाच आनन्द वाटतो.

निदान मला तरी वाटतो!—

खेडवळ आनंद : १

# गाडी – जोडी

बैलगाडींची अशी विचारी आनन्ददायक कल्पना जितकी मोहक वाटते त्याहून कितीतरी पट आनन्द प्रत्यक्ष बैलगाडींत बसूनच अनुभवतां येतो. खेडेगांवांत कधींच पाऊल न टाकलेल्या शहरवासीयांना, हमरस्त्यांतून 'हॅट्' करीत एखादी छताची बैलगाडी जातांना दिसली तर ते तिला थट्टेखोरपणें हंसतील. पण खेडेगांवच्या लोकांना तीच अतिशय जिव्हाळ्याच्या आपुलकीनें आनन्दवील !—

'बैलगाडी !' म्हटलें कीं खेडेगांवीं लहानपणीं मधून मधून अनुभविलेल्या साऱ्या आनन्ददायक प्रसंगांची मला आठवण होते. त्यावेळीं 'काबाडी गाडींत' बसण्याची मौज सुद्धां आम्हीं भोगूं शकतो.

पण मग 'सारवट' (किंवा स्वारीच्या) गाडीमार्गेंच साधारण लहानमोठ्या खेडवळांचे डोळे लागलेले असतात !—

स्वारीच्या बैलगाडीचीं दोन महत्त्वाचीं अंगें !– एक बैलजोडी आणि दुसरी बैलगाडी !—



आणि दोन्ही अंगांनुसार या खेडेगांवच्या लोकांच्या अगदीं विविध हौशी होतात,... असतात !—

ते बैलांचे रंग सारखेच पसंत करतील, तर विरोधाच्या आवडीवर काळा–पांढरा, काळा–पिंवळा, करडा–तांबडा, काळा–काबरा, ठिपक्या ठिपक्याचे ...... पण असली यादी देण्यांत अर्थ नाहीं !

आणि मग— त्यांचीं नांवें ठेवायचीं तींही अशींच;– रंगावरून.. 'जांभळ्या' 'पवळ्या' 'काळ्या' 'ढवळ्या', .... तर चालीवरून अगर इतर गुणांवरून 'हौश्या' 'डौल्या' 'सोन्या' 'हिऱ्या' फार काय, 'फेंगड्या' 'खानमान्या' असलींसुद्धां नांवें क्वचित् आढळतील ! ... आतां राहिलीं तीं माणसांचीं नांवें. खेडेगांवच्या माणसांचीं नांवेंहि विविध असतात. देवाप्रमाणेंच दगड, वार यांच्याशींहि त्यांची चढाओढ चालते. (आणि हीं नांवें अर्धवट घेण्यांत तर त्यांना जास्त मौज वाटते.) तेव्हां त्यांच्या बैलांचीं नांवें, 'शिरप्या' 'दगड्या' 'मंगळ्या' सारखीं आढळलीं तर त्यांत आपल्याला आश्चर्य वाटावयास नको !

मुख्य म्हणजे खेड्यांतील बैलांनाहि माणसासारखे हक्क आहेत. दोघांच्याहि आयुष्यांत निसर्ग जास्त प्रामुख्यानें वावरतो.

बैलजोड्या अशा एकदम विकत घेण्यापेक्षां खरे हौशी लोक 'घरच्या गोऱ्यां'ची जोडी तयार करण्याचीच अधिक खटपट करतील. आपल्याच घरांत त्यांना लहानाचे मोठे करायचे,

खाऊन पिऊन मस्त करायचे— आणि शैशव संपल्यावर मुलांना शाळेंत पाठवून तेथें धडे देतात त्याप्रमाणें त्यांना नाथ टोचायची, नाल मारावयाची व शेवटीं जाणत्या बैलाबरोबर गाडीला बांधून त्याला 'गाडीला काढावयाचा'! ... या साऱ्या संस्कारांतून तो एकदां नीट गेला म्हणजे तो पदवीधर झाला असं म्हणावयास हरकत नाहीं.

पण त्या सर्व दिव्यांतून जातांना त्या 'गोऱ्या' इतकंच गाडीच्या 'खेड्यां'नाहि सोशीक बनावं लागतं!

बैलजोडी इतकाच स्वारीच्या गाडीच्या बांधणी-तयारींतहि विविध हौस आढळेल. खाणावळीचं जेवण व घरचंहि जेवणच! जेवण तेंच!... पण डब्यापेक्षां घरच्या जेवणाची मौज कांहीं निराळीच!

तसेंच सुताराकडून एकदम एखादी तयार गाडी रोख पैसे मोजून घेण्याऐवजीं, ..... या वर्षी घरच्या भेंडीच्या फोंकांचं धुराडं, ओळखीच्या जंगलकूप ठेवणाऱ्या कॉंट्रॅक्टरनें दिलेलं लांकूड वापरून केलेला चाकजोड, घरच्या गड्यांनीं कोयतीनें केलेली 'शिवळ' व केळीचे सोप वळून विणलेली 'जोत' किंवा बांबूच्या कामठ्यांनीं घरीं बनविलेला टपाचा सांगाडा, सागाचा भक्कम आंस— (त्यासाठीं ते महीने महीने वाट पाह-तील)— किंवा लोखंडी स्प्रिंगचा आंस ... अशा तऱ्हेनें हळु-हळू घरच्या घरीं तयार होत असलेल्या स्वारीच्या गाडीसाठीं



खेडेगांवचे लोक वर्षेंवर्षे त्यांतच जीव गुंतवून थांबावयास तयार असतात.

साहजिकच आहे!— रेडीमेड कोट-शर्टपेक्षां खेडवळ शिंप्यानें दिरंगाई करून शिवलेलं कुडतं वापरणारे लोकच तेथें जास्त!

# ‘स्वारीच्या गाडी’च्या स्वाऱ्या

अशी एकदां गाडी जोडी तयार झाली कीं झूल पडद्याचें छप्पर शिवून जोडीच्या शिंगांना गेरू फांसून, त्यांच्या गळ्यांत व गाडीला, ते झेंडूच्या माळा अडकवतील; आंसाखालीं टांगलेल्या काळ्या, मचकट, नरोटींतील वंगण लोखंडी तारेला लावलेल्या बोळ्यानें ते कानखिळीजवळ चाकांत सोडतील; .. व दसऱ्याच्या मुहूर्तावर गाडी प्रथम बाहेर काढतील.

यात्रेळीं इतके दिवस आंतल्याआंत दडपलेल्या त्यांच्या गाडी-जोडीविषयींच्या साऱ्या अभिमानाच्या भावना जाग्या होतात! आणि कुणाची गाडी-जोडी पुढें जाते अशी चुरशीची ‘काढा-काढी’ सुरू होते. ज्याची गाडी पुढें जाईल त्याचा आनन्द स्वर्गीय असतो. त्यापुढें एखाद्या महायुद्धांतील विजयही रद्द असतो.

पण ही केवळ नात्रिन्यांतील मौज नसते. बाराही महिने ते गाडी-जोडीची निगा राखतील!

दिवाळीच्या सुमाराला रंग काढून घेणें, पावसाळ्याच्या सुरवातीला मेणकापडाचें आच्छादन घालणें, दोनदोन वर्षांनीं चाकजोडाची किंवा आंसाची बदली करणें, असली गाडीसाठीं कसली ना कसली तरी खटपट त्यांच्या मनांत व आयुष्यांत चाललेली असायचीच!

बैल तर काय त्यांचे नित्याचेच मित्र! त्यांचं खाणं पिणं तीच यांची तृप्ति! त्यांचा गोठा सोयीचा आणि निरोगी असण्यांतच यांचं समाधान! त्यांना विसावा तर यांना उत्साह! असे जवळ जवळ नेहमीचे ठोकताळे असतात.

आणि बैलगाडी हांकणे हीहि एक कला आहे बरं का? दर्दी मनुष्य नुसत्या पागा हालवून न बोलतांच करील, तें नवख्या माणसाला बैलाच्या पाठीवर काठीचे सपाटे किंवा पराणी मारूनही आणि आरडाओरड करूनहि साधणार नाहीं. बैल झाले म्हणून काय– त्यांनाहि स्पर्शेंद्रिय हें असतेंच, माणसामाणसांच्या आवाजांतील फरकही त्यांना कळतो– आणि आपल्या मालकानें हातांत पागा धरल्या आहेत व तोच इषारा देत आहे, ... कीं त्याच्याकडे आलेला ‘मर्मईचा पावणा’ हें ते एकाच क्षणांत जाणतात.

कारणहि उघडच आहे! स्वारीची गाडी असलेल्या एखाद्या खेडेगांवच्या मालकाला भर दुपारीं गाडी जोडायला सांगा. तो कधीं त्या गोष्टीला कबूल होणार नाहीं. ती कांहीं तुमच्या मुंबईच्या पेट्रोलवर चालणारी मोटर गाडी नव्हे. बैलांनाहि जीव असतोच.

नाहीं तर, उलट, एखाद्यावेळीं तुम्हीं मुंबईच्या पद्धतीनें पहांटेची साखरझोंप घेत असतांना तोच तुम्हाला रंगांत येऊन जोराजोरानें उठवील आणि म्हणेल, 'चला चला लौकर!— पवळ्या-काबऱ्या जोडले आहेत!— सूर्य वर येईपर्यंत जाऊन येऊं माहीमच्या बाजाराला!—'

तुम्हीं मनांत म्हणाल, 'काय कटकट आहे याची!!'

— पण जरा आळस टाकून गाडींत पाय तर टाका कीं, तुम्हाला खरा आनन्द स्वतः भोगतां येईल व त्यालाहि तो घेऊं दिल्याचं श्रेय मिळवतां येईल.

खरंच, पहाटे बैलगाडींतून प्रवास करण्यासारखं सुख नाहीं, माझ्यामतें!

नव्या दिवसाला सुरवात झालेली असते. मंद वाऱ्याच्या झुळुका आपल्याला गोंजारून जात असतात. पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झालेला असतो. ...... अशा वेळीं बैल आपली गाडी मनुष्यवस्तीपासून लांब, हमरस्त्यानें किंवा त्याला फुटलेल्या माळरानावरील फांट्यातून— गराडींतून — ओढून नेत असतात. त्यावेळीं बैल, खेड्या, आपण, सारखेच उत्साहांत असतों व गाडीचा मंद घुमणारा शब्द, घुंगुरांचा आवाज, चाकाचं सरपटणं किंवा ... या साऱ्यांचा अनुकूल परिणाम होऊन आपण अंतःस्फूर्तीनें गाऊं लागतों! ... त्यावेळीं, कधीं कधीं, आपल्याला गावयास येत नाहीं याचंही, आपल्याला भान रहात



नाहीं. पण आपल्यांतला एखादा मधुर आवाजाचा असला तर त्याच्या कंठांतून निघणारे भैरव— भैरवी— जोगियाचे मंजुळ स्वर या साऱ्या शांत व उत्साही वातावरणास अधिकच गोडवा आणूं शकतात!—

पहाटेप्रमाणेंच संध्याकाळीं, (विशेषतः आपण बैलगाडींतून घराकडे परतत असलों व बैलांना आणि आपल्यालाही घराकडची ओढ लागलेली असली म्हणजे) आनन्द वाटतो. पण त्यापेक्षां चांदण्यांतून बैलगाडीचा प्रवास करण्यांत फारच मजा येते.

आणि एकदां आपल्याला ती चटक लागली म्हणजे मग आपण जवळपासच्या आठदहा मैलांच्या टापूंतील एकहि 'यात्रा' सोडीत नाहीं!—

आज काय सितळा देवीची तर उद्यां काय आगरची!.. मुख्य म्हणजे आपल्याला गाडींतून फिरायला कसलं तरी कारण पाहिजे असतं!— आणि वास्तविक, सर्वांनीं मिळून हंसत खेळत चांदण्या रात्रीं बैलगाडींतून प्रवास करण्याचा आनन्द भोगावा हीच मुळाशीं मुख्यतः कल्पना असते. त्यावेळीं गप्पांना इतका पूर येतो, गाण्याला इतका ऊत येतो, रंग येतो कीं शहरांत तसा कधींच येणार नाहीं. तेथला तो नैसर्गिक वातावरणांतील फेसाळणारा आनन्दसागर कोणीकडे व शहरांतील कृत्रिम व मर्यादित आनन्दाचा तोच तोचपणा कोणीकडे....!

आणि तेथून मध्यरात्रींनंतर परततांना पीठासारखं शुभ्र

चांदणं, झाडझाडोऱ्यांच्या दुडक्या चालींत धांवणाऱ्या चित्रविचित्र आकृत्या, क्वचित् ऐकूं येणारी कोल्हेकुई, एकाकी भाळूचं भयानक ओरडणें, खिंड किंवा ओढे वाटेंत असल्यास ते ओलांडताना वाघाच्या फेऱ्यांच्या काल्पनिक जागा, किंवा प्रत्येक खेडेगांवीं सांगी वांगींतून चालत आलेल्या 'भुतांच्या लग्ना' च्या अगर इतर अपघातांच्या जागा ... त्यावेळचं तें अगम्य भयग्रस्त व विचलित अंतःकरण ... !

आपल्यापुढें व आपल्यामागून आपल्यासारख्याच घराकडे परतणाऱ्या बैलगाड्या आहेत या कल्पनेनेंच काय तें ...... आपण त्या गंभीर भयद वातावरणांतूनाह अभिनव मौज अनुभवूं शकतों !—

आंतल्या खोलींतून बाहेरच्या, बाहेरच्या खोलींतून रस्त्यावर व रस्त्यावरून चौपाटीवर किंवा आपल्या कामधंद्याच्या ठिकाणीं, रिंगणांत फिरल्याप्रमाणें जाणाऱ्या येणाऱ्या मुंबापुरस्थांना या अनुभवाची कधींच कल्पना करतां येणार नाहीं. त्याला प्रत्यक्ष बैलगाडींतच जाऊन बसावं लागेल.

बैलगाडीचा आनन्द बैलगाडींत बसूनच आस्वादतां आला तर येईल !— असल्या वरवर हास्यास्पद वाटणाऱ्या वाक्यांतहि अनेकदां खोल अर्थ भरलेला असतो !—

शहरांतील लहान मुलांच्या अभ्यासक्रमांत 'अण्पांच्या बैलांच्या जोडी'चा शिरकाव झाल्यामुळें मला आनन्द वाटला तो एवढ्याचसाठीं ! एवढ्यामुळें तरी त्यांना बैलगाडीचा आनन्द प्रत्यक्ष



भोगण्याची, आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी उत्कट इच्छा होईल ! ....

मला वाटतें, बैलगाडी हें खेड्याचं प्रतिक असं जितक्या अर्थपूर्णपणें म्हणतां येईल तितक्याच अर्थपूर्णपणें म्हणतां येईल कीं 'बैलगाडी हें मानवी जीवनाचें— माणूसकीचें— प्रतीक आहे !'

## अरण्यांतील फेरफटके : १

# त या री व दि शा

अगदीं गजबजलेलें शहर टाकून आपण खेडेगांवाकडे जातों. खेडेगांवची मनुष्यवस्ती सोडून आपण बैलगाडींतून रानावनाजवळपास फिरतों.

पण रानावनांत भटकण्याचा प्रत्यक्ष आनन्द आपल्याला मिळवावयाचा असेल तर आपली बैलगाडी एका बाजूला एखाद्या झाडाखालीं सोडून बैलांपुढें गवत टाकून आपल्या स्वतःच्या पायावरच आपल्याला स्वार व्हावं लागेल. पण मग त्यापेक्षांहि, घरापासूनच, हातांत एक दांडका, डोक्यावर हॅट, अंगांत सैलसा अर्धा सदरा व धोतराचा काचा अगर खाकी शॉर्ट पॅंट, पायांत कॅन्व्हासचे चिकटून बसणारे बूट व गळ्यांत अडकवलेली जरुर वस्तु टाकलेली पिशवी,— अशा वेषांत चालत निघणेंच मी तरी पसंत करीन. कारण मग मार्गे कसलंच बंधन म्हणून नसतं. वाटेल तिथं बसावं, वाटेल तेव्हां चालावं व लहरीला येईल त्याप्रमाणें लवकर किंवा अगदीं अंधार पडल्यावर थोडी



वाट चुकत चुकतच भीतीनें किंचित् विचलित होण्याचा अनुभव घेऊन घराकडे परतावं !

या कपड्यांच्या बाबतींत एक लक्ष्यांत ठेवण्यासारखं आहे ! नवखा मनुष्य घरून निघतांना थंडी असलेली पाहून मारे मफलर गळ्याला गुंडाळील,...... उबेसाठीं दोन स्वेटर चढवून त्यावर मोठा गरम ओव्हरकोट चढवील,...ढोंपराखालच्या पायांना वारं लागूं नये म्हणून फ्लॅनेलची लंबी विजार घालण्याचा त्याला मोह होईल ! ... पण मग रानांत भटकतांना, चालून चालून अंगांत खूप उष्णता आल्यावर, मफलर, स्वेटर, ओव्हरकोट, फ्लॅनेलची विजार, सारं खांद्यावर टाकून उलट तें ओझंच संभाळीत वांकड्या तिकड्या मार्गानें चालण्याची त्याच्यावर पुढें पाळी आली म्हणजे तोच स्वतः स्वतःला त्या बाबतींत जगांतील सर्वांत महामूर्ख ठरवील ! ...

आणि म्हणूनच दर्दी मनुष्य साधा सुटसुटीत हलका पोषाख करून कांहीं काळ थंडीनें कुडकुडण्याच्याहि तयारीनें घराबाहेर पडेल.

पण असला फेरफटका करावयास जायचं कुठं ? हाच प्रथम प्रश्न येतो. केवळ माथेरानच्या 'एको' 'डेंजर' 'बॉम्बे पॉइंट' कडे जा; महाबळेश्वरच्या रमणीय अरण्यांत शिरा; लोहगड, कार्ले, वगैरे ठिकाणचे अवशेष पहावयास लोणावळ्याजवळ भटका; सिंहगड वगैरे इतिहासप्रसिद्ध किल्ले सर करा, किंवा सज्जनगड, पन्हाळा, रायगड, वगैरे ठिकाणीं चढून आजूबाजूच्या प्रांता-

वर मावळी मोर्चा फिरवा; .... अशी एखादी ठराविक यादी देण्याचं स्वयंनिष्ठ वेड माझ्या डोक्यांत या क्षणीं तरी नाहीं !

तेथें गेल्यावर ऐकून परिचित असलेले ते देखावे पहाण्याचा किंवा इतिहासकाळाचा राहिलेला अवशेष अतृप्त अंत:करणानें आपल्या मनांत सांठविण्याचा आनन्द जितका लाभेल, ... तितकाच ... गोकाक, दुधसागर येथील पाण्याचे पांढरे फवारे व इंद्रधनुष्य, ... व्हेरिनाग अच्छाबलचे झुळझुळते शीतल झरे, .. पेहेलगांवचा विस्तीर्ण कुरणाचा देखावा, ...... खिलनमर्गचे लांबचे बर्फमय डोंगर अगर भुसभुशीत बर्फाच्छादित विस्तीर्ण पठारें, ...... रावाळपिंडीहून काश्मीरकडे येतांनाच्या वाटेंतील खोल दऱ्यांतील सारीपाटाप्रमाणें पसरलेलीं इवलालीं शेतें, ..... वायव्य सरहद्दीवरील किंवा खैबर–पासमधील भकास, रुक्ष व खडकाळ भाग, ... कुतुबमिनारजवळील ओसाड माळरान, ... अबूच्या पहाडाजवळील वनराई ... या साऱ्या निसर्गरम्य ठिकाणचीं मन उल्हसित करणारीं दृश्यें, आयुष्यांतील आनन्दाची आपल्याला शिदोरीच बांधून देतील. सारी विविधता आनन्दांत भरच घालील !—

आपले उद्योगधंदे, घरदार सोडून असं लांब फिरावयास जाण्याची सर्वसाधारण मनुष्याची कुवत नसते अशी तक्रार अगर कुरकुर येथें झाली तर ती अगदीं अस्थानीं आहे असं मी म्हणणार नाहीं. पण प्रत्येकाच्या जवळपासहि निसर्ग नांदत असतो. लांब जातां आलं नाहीं तर आपल्याच गांवाजवळपास-



च्या प्रदेशांवर दृष्टी ठेऊन, त्यांच्या अगदीं अंतरंगांत शिरावयास तर कांहीं पैसे पडत नाहींत खास. तुम्हांला अगदीं कल्पनाहि आली नसेल असें विविध सौंदर्य, ... नाविन्य आपलं स्वागत करावयास तेथें पुढें येईल.

मात्र असल्या हेतूनें बाहेर पडल्यावर एक लक्ष्यांत ठेवलं पाहिजे !— फर्गुसन हिलवरील 'कविकातला' पर्यंत किंवा पेन्शनरांच्या मारुतीपर्यंतच केवळ जाऊन थबकायचं नाहीं. पुढली डोंगरांची रांग ओलांडण्यास वाट शोधूं लागलं पाहिजे. उतरणीवर घसरत जाऊन तेथल्या खालच्या लहानशा दरींत पाऊल टाकलं पाहिजे ! ... कोल्हापूरच्या फक्त राजाराम टँक-पर्यंत पोहोंचून थांबण्यांत अर्थ नाहीं. आणखी आंत शिरून डोंगराचा माथा गांठला पाहिजे. माणसीं 'आणा डोकें' जकात देऊन, तांबडें तिकिट दाखवीत जोतिबाच्या यात्रा–गर्दींत शिरावयाचें व 'जोतिबाच्या नावान् चांद भला' म्हणावयाचं, यानें मला तरी मौज वाटणार नाहीं ! त्यापेक्षां मधल्याच एखाद्या दिवशीं मजेनें तेथें जावयास पाहिजे. मग जोतिबाचा चांद किती भला असतो व त्याच चांदण्यांत तेच पूर्व–परिचित देखावे किती आनन्ददायक असतात याची तुम्हांला माझ्याइतकीच खात्री पटेल ! लोणावळ्याचा धरण कितीहि भव्य असला तरी त्यामागील नैसर्गिक दगडाळ उंच सखल रानवट देश त्याहूनहि भव्य आहे ही जुरस अंगांत पाहिजे ! ठाण्याजवळच्या तानसा तलावांतच केवळ मन गुंतवून बसण्यांत हंशील नाहीं. त्यामागेंहि

अगम्य निसर्ग-सुंदर डोंगर आहेत याची जाणीव ठेवली पाहिजे. विस्तार पावून पसरलेल्या मांडव्याचा फेंसाळणारा समुद्रकिनारा दीपमाळेवरून कितीहि सुंदर दिसत असला तरी त्यामागच्याच सासवनें-धोंकवडें गांवांच्या डोंगरांची, तेथील मधून मधून आढळणाऱ्या सपाट पठारांचीं किंवा लांबून पिसारा पसरलेल्या मोरासारख्या दिसणाऱ्या झाडांची शोभा त्यापेक्षांहि सुंदर दिसेल अशी मनांत अहमहमिका बाळगली पाहिजे !... मालवण बंदराजवळील सिंधुदुर्गाकडे दोन माणसांच्या छोट्या होडींतून अथांग सागरावर भीतीप्रद हेलकावे खात जाऊन तेथील पडके पण भक्कम बुरुज किंवा समुद्राच्या मध्यभागीं आढळणारी गोड्या पाण्याची विहीर पहातांना जितकं समाधान वाटेल त्यापेक्षांहि जास्त पाटपरुळ्याच्या, धामापूरच्या किंवा वालावलीच्या तांबड्या मातींत पसरलेल्या, रंगीबेरंगी पानें धारण करणाऱ्या, काजूच्या झाडोऱ्यांतून जातांना व त्या मागल्या डोंगराळ भागांत बसतांना आनन्द वाटेल, ही आशा धरिली पाहिजे. वाफोरांतून पणजी-वास्कोच्या भोंवतीं यांत्रिक पद्धतीनें फिरण्यांतील मौज, ... सावई वेरें, बोरी, रिवण जवळपासच्या निसर्गरम्य प्रांताच्या दर्शनामुळें फिकी पडते याचा अनुभव पाहिजे.

मला सांगावयाचं आहे तें इतकंच कीं मनाची तयारी असल्यावर आपल्या घराजवळपासच्या रानावनांतहि आपल्याला आनन्ददायक फेरफटके करतां येतील !

एवढंच कशाला, मुंबईंत आपल्या निरुंद कोंदट खोलींत,



गजबजलेल्या रस्त्याला लागूनच बसून देखील कधीं कधीं बालकवीच्या 'निर्झरा' बरोबर आपण खेळतों. त्या वेळीं आपण स्वतः शींच—

'गिरि शिखरें वनमालाहि ! दरीदरी घुमवित येई !—
कड्यावरुनि घेऊन उड्या, खेळ लतावलयीं फुगड्या,
जा हळुहळू वळसे घेत, लपत छपत हिरवळींत'

असं म्हणूं लागतोंच कीं नाहीं ! आणि मग पुढले 'वसन्त मंडप' 'वनराई' झुलणारीं 'पाचूचीं हिरवीं रानें' सारं सारं दृश्य डोळ्यांपुढें उभं राहून आपण आनन्दतोंच कीं नाहीं ?

मग या शहरी खोलींत बसून असला रानावनांतील फेरफटका करण्यापेक्षां जवळपासच्या प्रदेशांतील प्रत्यक्ष फेरफटका खासच जास्त आनन्ददायक-उत्साहवर्धक ठरेल !

अरण्यांतील फेरफटके : : : २

# अरण्यांतील आनंद सागर

रानांत भटकतांना आपण नेहमींची आपल्या शरीराविषयींची शहरी कुरकुर विसरतों, आपल्या शरिराविषयीं आपण अगदीं बेफिकीर होतों, हा एक फार मोठा फायदा म्हणून सांगतां येईल.

काश्मीर प्रांतांत आपण शिरलों तर थंडीची पर्वा न करतां आपण आपल्याला भुसभुशीत हिमांत कमरेपर्यंत पुरून घेऊं, तो हवा तितका बोकणूं किंवा तासतास रक्त गोठविणाऱ्या बर्फांत लोळत पडूं ! . . . तुम्ही कोकण प्रांत भटकूं लागलांत तर हिरवी कच्चीं करवंदें चावून तुमचे दांत शिवशिवणार नाहींत किंवा झाडावर दिसणारे रंगीबेरंगी काजूचे बोंडू तोडून तसेच कुरतडून खातांना त्यांचा राप तुमच्या घशाला खवखवणार नाहीं. उंच टेंकडीवर चढण्याचा प्रयत्न करीत असतां आपला तोल जाऊन आपण कोलमडून पडूं ही आपल्याला भीतीहि वाटणार नाहीं ! . . . . . पडलोंच तर तेंहि नाविन्य अनुभवून आपण आनन्दानं हंसू. ढुंगणावर घसरत उतरतांना आपल्या उघडया पायांना कांटे बोंचले अगर खरचटलें तर पटकन् झामबकची डबी शोधण्याची शहरी खटपट आपण करणार नाहीं. समुद्राच्या पाण्यांत आंत आंत जातांना आपले पायमोजे बूट भिजले किंवा उघड्या पायाला धारेचा खडक लागून त्याला खारं पाणी झोंबलं अगर निसरड्या दगडावर पाय अचानक घसरून आपलं बोचकं एकदम खालीं आलं तर तेव्हांही आपल्याच फजीतीला आपण मनमुराद हसूं. अशा मनःस्थितींतच आपण भटकत असतों म्हणूनच रानांत चुकणें ही देखील आपल्याला एक मजा वाटते ! किंबहुना असं रानांत फिरतांना रस्ता चुकला नाहीं तरच उलट मला चुकल्या चुकल्यासारखं वाटतं !



कोठल्यातरी बाजूला मोर्चा फिरवून आपण कोठेंतरी म्हणून जात असावं,. . . आणि त्याच वेळीं आपल्या समोर सहस्र वाटांचं जाळं दिसत असावं. फुटणारे रस्ते ऊर्ध्व व अधर दिशा . . . तेवढ्याच बाकी सोडून सर्व बाजूंस जाणारे असावेत ! म्हणजे मग जी गंमत व गोंधळ मनांत उद्भवतो त्याची मजा इलस्ट्रेटेड वीकलींतील 'क्रॉसवर्ड' सोडवणाऱ्या कित्येक महाभागांनाच कदाचित समजूं शकेल !

कारण मुद्दाम वाट चुकायचं ठरवून वाट चुकली तर त्यांत गंमत नाहीं. आपल्या कल्पनेप्रमाणें आपण अगदीं अचुक निवड केली अशी खात्री झाल्यानंतर व बरंच चालून आल्यानंतर, अगदीं नैसर्गिकपणें आपल्या तोंडून 'वाइच् चुकलों ; पण

केवढो मोठो भोंवाडो झालो!— असले शद्ब आल्यावर खरी मौज वाटते. कारण असलं चुकीचं ठिकाण हेंच अननुभूत अभिनव आनन्द आपल्याला मिळवून देणारं योग्य ठिकाण असतं!— कारण वास्तविक कुठं जावयाचं असतं हें आपलं आपल्याशींहि कांहीं नक्की ठरलेलं नसतं.

आणि मग अशा तऱ्हेनें चालून थकल्यावर आपण जवळ-चंच एखादें स्थळ 'सौन्दर्य स्थळ' ह्मणून ठरवितों व तेथें सौन्दर्य पहाण्यास ह्मणून ( पण खरोखर पाहतां अत्यावश्यक वाटणाऱ्या विसाव्यासाठीं ) बसकण घेतो! कारण असं कीं, या पूर्वीं तसलींच अनेक सौन्दर्यस्थळें आपल्याला वाटेंत लागून गेलेलीं असतात. आणि त्यावेळीं आपण पुढें आणखी मौज आढळेल या उत्साहांत मोठ्या आशेनेच पुढें चालतहि आलेलों असतों.

पण वाट चुकून अशाच एखाद्या 'सौन्दर्यस्थळा' जवळ आपण बसलेलों असतांना संध्याकाळ झाल्याची आठवण झाली कीं जी एक भीतीची अगम्य लाट हृदयांतून, साऱ्या अंगांतून नकळत निघून जाते, ती कांहीं औरच!

तत्काळ आपण झटकन् उठतों. गोंधळलेल्या मनानें, ... खालच्या सखल प्रदेशाकडे कसे पोहोंचूं, अगदीं जवळची पाऊल-वाट कोणती या दृष्टीनें आपण आपलं डोकं क्षणभर खाजवतों! मानवी मनांतच बसलेलं होकायंत्र आपण येथें फिरवून पाहूं लागतों. आल्यावेळच्या मार्गातील सारीं 'सौन्दर्यस्थळें' आपल्यापुढें त्यावेळीं उभीं रहातात. त्यांतील कांहीं काळोखांत विरत



चाललेलीं लांबवर प्रत्यक्ष दिसतात — पण मग त्यांचा तसा कांहीं खरोखर उपयोग नसतो. त्यांतच शेवटीं आपण जव-ळचा व खरा मार्ग ह्मणून निवडलेली पाऊलवाट नागमोडी वळणें घेऊन उलटी फिरूं लागली ह्मणजे तर आपल्या मनाची जी कांहीं गंमत होते ती अवर्णनीयच असते. तोंडचं पळालेलं पाणी परत मिळविण्यासाठीं ह्मणून नव्हे तर अगदीं नाइलाज म्हणून आपण पाणी आटून सुकलेल्या एखाद्या रानाच्या ओढ्याची पहाणी करूं लागतों. आणि तो सांपडला म्हणजे मग तेथें पाणी नसतांही आपल्याला हायसं वाटतं! अगदीं एखादा सोबती वाटाड्या त्या रानांत अनायासं मिळाल्याचा त्यावेळीं आनंद वाटतो!

कारण आपलं मन केव्हांच खालच्या सपाट मैदानापर्यंत जाऊन पोंहोचलेलं असतं. आतां टेंकडीवरील आपलं शरीर तेवढं आपल्याला शीरसलामत खालीं पोहोचवावयाचं असतं व 'महाजनो येनगतः सपंथः' असं म्हणून आपण त्या सुकलेल्या ओढ्याच्या पात्राचा... त्याच्या खडकाळ वाटेचाच... अगदीं धीरानें अनुकार करतों.

पावसाळ्यांत हा मार्ग पाण्यानें भरलेला असतो. टेकडीवरचं पाणी या ओढ्यावाटेच खालीं जातं याची आपल्याला आठवण होते!.. आणि 'पाणी आपली सपाटी शोधतें' हें शास्त्रीय तत्व इंग्रजी शाळांच्या सुरवातीच्या यत्तांपासूनच आपण शिकलेले असतों. आपल्यालाही या टेकडीवरून खालच्या मैदानापर्यंत पाण्याप्रमाणेंच यावयाची त्याक्षणीं इच्छा असते. आणि म्हणूनच पावसाळ्यांत

पाण्यामुळें व निसरड्या दगडांमुळें निरुपयोगी ठरेल असा तो ओढ्याचा मार्ग आपण या कोरड्या वेळीं आपली पाऊलवाटच ठरवून टेकडीवरून खालीं उतरूं लागतो.

अर्थात् तें जरा धाडसाचंच असतं. पण त्यावेळच्या आपल्या भीतिग्रस्त अंत:करणांतील जीवनकलहापुढं तें धाडस अगदींच फिकं पडतं. आपण फुटाफुटाच्या खोलीनें, धडपडत धडपडत आणि वांकडीं वळणं घेत, दगडावर ठेंचाळत, हातांतील दांडक्याचा आधार घेत, डोक्याची साहेबी हॅट चामड्याच्या पट्ट्यानें मानेवर मागच्या बाजूस पाठीवर लोंबकळत ठेऊन, क्षणाक्षणाला खालचा सपाट पायथा जणूं काय पाण्याच्या वेगानेंच गांठत असतों.

आणि त्यावेळींच हातांतील दंड्याची व पायाला चिकटून बसणाऱ्या कॅनव्हॅसच्या बुटांची, खांद्यावरून लोंबकळणाऱ्या हलक्या खाकी पिशवीची व अंगातील सैल कपड्यांची खरीखरी महती समजून येते !



अरण्यांतील फेरफटके : : ३

# डोंगर आणि सपाटी

असल्या अनेक दिव्यांनंतर, शेवटीं अगदीं काळोख पडला असतांना आपण सपाट जमिनीवरून थोडेसे खरचटलेल्या स्थितींत कां होईना शीरसलामत चालूं लागलो म्हणजे किती धीर येतो मनाला ! क्षणभरच आपण चागच्याजागीं थबकतों व उतरून आलेल्या टेकडीची उंची काळोखांतच अजमावतों. आपण जवळ जवळ धांवतच किंवा त्यापेक्षां एखाद्या दगडाप्रमाणेंच खालीं गडगडत आलों ! ...तो ओढ्याचा जवळचा रस्ता' सारं चुकलं असतं तर 'मृत्युचाही जवळचा रस्ता ' ठरला असता ! या साऱ्या वस्तुस्थितीची जाणीव होऊन क्षणभर आपल्या अंगावर भीतीचे शहारे उभे रहातात!

आपण पुन्हां सपाट जमिनीवर जिवंतपणें चालत आहों या विचाराची एकदां खात्री करण्यासाठीं आपण आपली हॅट, बूट, गळ्यांतील पिशवी, वगैरे सारं सामान चांचपतों. पण त्यामागें खरा हेतु 'आपलं शरीर शाबूत आहे ना!' हें पहाण्याचाच

असतो. आणि मग सर्व जागच्याजागीं आहे अशी बालंबाल खात्री झाली म्हणजे आपण दोघे तिघे सोबती असलों तर एक-मेकांची दहा मिनिटांपूर्वीची धांदल आठवून देऊन टिंगल करतों. व एकटेच असलों तर आपलेच सारे, गमतीदार अनुभव आठवून त्या शांततेंत आपण स्वतःशींच मोठ्यानें हंसतों.

झाल्या गोष्टी झाल्या ही वृत्ति माणसांमध्यें यावयास उशीर लागत नाहीं. या सपाट मैदानावरील आपलं प्रस्तुत घटकेचं व आपल्या घराजवळपासच्या मनुष्यवस्तीचं स्थान अजमावण्याची पुढल्या कांहीं मिनिटांची आपली धडपड असते. तेथल्या सपाटी-मुळें आपल्याला धीर येऊन आपण लांबवरचे डोंगर, मिणमिण-णारे दिवे, यांवरच आपली दिशा ठरवतों—व घरच्या ओढीनें जोरा-नेंच धांवूं लागतों.

सारं अगदीं शांत असतं. किर्र किर्र भोंवतीं गजबजतं तेव-ढंच ! काळोखाचं पटल अगदीं दाट पसरलेलं असल्यामुळें कांहींच समजत नाहीं. क्वचित एखाद्यावेळींच लाखों असंख्य काजवे आपल्या भोंवतीं फिरतांना किंवा झाडाझाडांना आकाशां-तील प्रज्वलित विभागांचेच स्वरुप आणून देतांना दिसतील तेवढेच ! त्यावेळीं मात्र, घराकडे भरभर चालतां चालतां त्या आनंददायक दृश्यांकडे गरगर मान फिरवून आपण पाहतों. पण नाहीं तर मग आपण आपल्याच मनांत डोकावतों. व यांत्रिकपणें आपलीं पावलें काळोखांतून मानवी घराकडे टाकतों.

अशावेळीं आपण अंतर्मुख होऊन चालत असलों तर दिव-



सभर घडलेले व अनुभवलेले सारे प्रसंग चित्रपटाप्रमाणें त्या काळोखांतूनच आपल्या पुढून जातात. आणि मग शेवटीं मनुष्य स्वभावाप्रमाणें, ...एखाद्या शब्दांत, वाक्यांत, प्रश्नांत,...आजच्या साऱ्या अनुभवाचे तात्पर्य काढीत आपण स्वतःशीं पुटपुटतों, 'मग आजच्या दिवसांत आपण मिळविलं काय !'

रुपये आणे पैच्या दृष्टीनें तर कांहींच मिळविलेलं नसतं ! कागदी पानांच्या लेखनवाचनाच्या हिशोबांतही आपल्याला कांहींच जमाखर्च देतां येत नाहीं. वाटेंतील सौंदर्यस्थळें आठव-तात !...सहजा सहजीं मनांत येऊन गेलेले विचार भावना आठव-तात ! ... व क्वचित् आपण आपल्या पिशवींतून नेलेलं आपल्या आवडत्या ग्रंथकाराचं पुस्तक, आकाशाखालीं उताणं पडून, सों सों करणाऱ्या वाऱ्यावर त्याचीं पानं फडफडत असतांना आपण वाचलं असेल तर ते शहरांतील कोंदट खोलीपेक्षां जास्त मोहक, जास्त गंभीर, विचारी वातावरण आपल्या भोंवतीं निर्माण करूं शकलं, ... याची आठवण होते ! सपाटी व डोंगर यांतील हाच फरक मला वाटतो !

म्हणूनच येथें मला प्रेमळ सूचना द्यावीशी वाटते कीं अशा अरण्यांतील फेरफटक्याच्यावेळीं पुस्तकें घेण्याची तुम्हाला इच्छा झालीच तर आपल्या पिशवींत 'चार आणे माला' किंवा 'किर्लोस्कर' 'झारापकर' कोंबूं नका ! तेथें गेल्यावर पस्तावाल ! त्या निसर्ग-रम्य गंभीर वातावरणांत तुम्ही पूर्वी वाचतांना तुम्हाला अतिशय

आवडलेलं तुमच्या प्याऱ्या ग्रंथकाराचं एखादं उज्ज्वल पुस्तकच घेऊन जा.

पण मग– 'कांहींच घेऊन गेलां नाहींत बरोबर तर फारच बरं होईल!' असंही एकदां मला सुचवावसं वाटतं! कारण पहा– आपण ज्या वातावरणांत दिवसाचे चोवीस तास, वर्षाचे बाराही महिने काढीत असतों, तें शहरचं वातारण इतकं कृत्रिम्, यांत्रिक असतं, तेथील जीव घेणारी गडबडघाई इतकी रोगप्रद असते कीं, अशा त्या वातावरणापासून क्षणभर दूर जावयाच्या वेळीं तेथलं कांहीं बरोबर घेऊन जाण्याच्या फंदांत न पडणंच बरं!

शहरचा 'उद्योग, उद्योग' आपण पुष्कळ दिवस ऐकत आलों आहों. आणि याचा परिणाम असा झाला आहे कीं दिवसेंदिवस निसर्ग व तेथील नितांतरमणीय शांतता यांचा आपला सहवास कमी होत चालला आहे— आणि 'वाचन,' 'ज्ञान' असलीच खपुष्पाला हात घालणारी पोपटपंचीहि इतकी वाढली आहे कीं निसर्गाच्याच सान्निध्यांत, अकाशाखालीं, हातपाय पसरून, डोळे उघडे ठेऊन किंवा मिटून, अगदीं कांहीं एक न करितां, निश्चल पडून घालविण्याच्या क्षणांची माणसाला आज अत्यावश्यक जरुरी भासूं लागली आहे!— मला मनापासून असं वाटतं. एवढ्याचसाठीं असली डोंगरावरील सपाटी मला तरी जास्त आवडेल!—

---



मानवी समाज : : १

# गरगरणारा भोंवरा

निसर्गाच्या गांभीर्याची, तेथील स्तब्धतेची, विशालतेची आवड वाढून, थोरोसारखे लोक वॉल्डेनकडे वळोत, त्याची महती गावोत! ...पण सर्वसाधारण माणसाला—किंबहुना कोणत्याही माणसाला—कायम अरण्यवास करणंच शक्य नाहीं. असं मला तरी वाटतं!

पूर्वींच्या तपस्वी ऋषीमहर्षींविषयींच्या कथा–आख्यायिका तरी आपल्याला हेंच सांगतात. कारण नाहींतर नारद आपला तंबोरा चिपळ्या घेऊन पुन्हां पुन्हां मृत्युलोकांतील माणसांत फेरफटके करीत राहिला नसता; विश्वामित्राला प्रतिसृष्टीची किंवा 'डोक्यावर हात घेण्याची' भानगड करण्याचं कांहीं कारण वाटलं नसतं; दुर्वासानें द्रौपदीचं सत्व पहाण्याची तापट वृत्ती धारण केली नसती; कण्वानें शकुंतलेला आपल्या आश्रमांत स्थान दिलं नसतं; कृष्णानें कौरव–पांडवांच्या भानगडींत हात घालून जगाला गीता पाजली नसती; व या सारख्याच आणखीही

पुष्कळ गोष्टी घडून आल्याचं आपण ऐकलं नसतं ! !—

तात्पर्य,.. वाल्मिकी तपश्चर्येला लागल्यावर त्याच्या अंगावर मुंग्यांचें वारुळ उभें राहिलें असें आपण ऐकतो तसेंच गिरीकंदरांत सहस्र आणि दशसहस्र वर्षें तपें लावून बसणारे हे सारे ऋषिवर्य एवढ्यांत मोठमोठे अचल डोंगरहि होऊन गेले असते. पण मला वाटतं, मनुष्य कितीही तपस्वी झाला, अगम्य दिव्यत्वामागें लागला तरी त्याला मानवी समाजाची ओढ अगदी नैसर्गिकच असते. किंवा त्याचं दुसरंही महत्त्वाचं कारण धरतां येईल. जर्मनींतील बहुतेक शाळामास्तर आपल्या शिष्यांना खात्रीपूर्वक पटविण्याचा प्रयत्न करितात ते त्यांच्या महान् कवी गटेचें सत्यपूर्ण वाक्य म्हणतें–"बुद्धीचा विकास कदाचित् एकांतांत होऊं शकेल; पण चारित्र्य–शील संपादण्यास मानवी समाजाचा गरगरणारा भोंवराच पाहिजे !"

मनुष्य प्राणीच मुळीं समुदाय करून, कळप करून रहाणारा ! आणि त्याची पूर्ण वाढ समुदायांतच व्हावयाची ! त्याच्या पहिल्या आहार–निद्रा–मैथुनादि पशुतुल्य उपजत बुद्धियुक्त जरुरी हळुहळू निवळत जातात खऱ्या; पण त्या या सामुदायिक जीवनामुळेंच ! व इतरांबरोबर वागतांनाच्या क्रिया–प्रतिक्रियांतच त्याचा विकास होत असतो. निरनिराळ्या वस्तू, व्यक्ती, कल्पना यांभोंवती त्याचें प्रेम हळुहळूं ओघानेंच केंद्रित होऊं लागतें. या प्रेमद्वेषाचें तीव्रत्व, या सामुदायिक आयुष्यामुळेंच कमी जास्त होतें. या विविध सजीव–निर्जीव केंद्रांभोंवतीं उभारलेलें हें प्रेम



तो आपल्या ध्येयवादी स्वाभिमानाच्या कोमल पण टणक रज्जूनीं निगडित करतो व त्यामुळेंच तो चारित्र्यशीलसंपन्न असा महात्मा पंडितमान्य सुभाषशील असा समाजदास पण समाजनेता बनतो.

पण या बाबतींत याहून सूक्ष्म पृथक्करण येथें करूं लागणें, हें आर्ष किंवहुना मूर्खपणाचें ठरेल !... आपल्या सारख्याच इतर माणसांच्या सहवासांत आनंद मानण्याचा हा मनुष्य स्वभाव आपल्याला पदोंपदी, अगदीं सहजासहजींच आढळेल; त्याला तात्त्विक चर्चेची कांहीं मुळींच जरुरी नाहीं. मानवी हिताच्या प्रगतीच्या विरुद्ध आयुष्य जगणारे म्हणून निवडून बाजूस काढलेल्या कैद्यांमध्येंहि, 'स्वतंत्र एकाकी कोठडींत टाकणें' ही गंभीर शिक्षा धरिली जाते. मग जगांत जगणाऱ्या सामान्य माणसांचे व विशेषत: या नेत्या पुरुषांचें तर काय ? त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण दुसऱ्याशीं वागण्यांत जातो. 'प्रेम–विवेकीं ते खुलती !' त्याशिवाय त्यांना करमणार नाहीं; त्यांची प्रगति ही होणार नाहीं.

मानवी समाज : : २

# नेते व तुम्ही आम्ही

आपली आई, आपले आईबाप, आपलीं भावंडें, आपलें कुटुंब, आपली नातलग मंडळी, आपली जात, आपला प्रांत, आपला देश, आपलें खंड, अशा प्रकारें माणसाचें हें आपुलकीचें क्षेत्र वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या विचारासरसें वाढत वाढत जातें. पण या साऱ्या आपुलकीच्या भावना दिवसेंदिवस विस्तृत होत गेल्या, तरी या विस्तृततेंतून या आतापर्यन्तच्या साऱ्या टप्प्यांचा कधींच लोप होत नाहीं! गांधीजींना जगांतील शांतता पाहिजे असली तरी त्याविषयीं प्रत्यक्ष प्रयोग ते देश-स्वातंत्र्यासाठीं करतील, कस्तुरबांवर ते पूर्वीसारखेच प्रेम करतील, व आपला मुलगा वाईट चालीचा झाला असें आढळल्यास इतरांप्रमाणेंच त्यांनाहि दुःख होईल. मात्र या साऱ्या प्रकारांकडे पहाण्याची त्यांची दृष्टी असामान्य व सुरवातीहून निराळ्या, ... वरच्या दर्जाची असेल; किंवा भावनांची कमी अधिक उत्कटता ध्येयानें मर्यादित होईल. फरक एवढाच काय तो!—



पण या असामान्य कक्षेंतून आपण क्षणभर खालीं उतरूं!— आपण सामान्य माणसें जगतों कशाला? आपली धडपड कशाच्या जोरावर असते?...जरा सूक्ष्मपणें पाहिलें तर आपल्याला आढळेल कीं हीं मोठीं माणसें जें विस्तृत कक्षेंत करीत असतात, तेंच आपण लहान लहान कक्षा उभारून त्यांत करीत असतों! नाहीं कां?—

त्यांना सारं जग हें आपलं घर वाटतं. 'वसुधैव कुटुंबकम्' हीच त्यांची वृत्ति! तर आपण छानदार चिरेबंदी, निरनिराळे आकर्षक रंग काढलेली इमारत आपलं घर मानतों;...त्यांना जगांतील सारीं चालतीं बोलतीं माणसें आपल्या घरचीं मानतां येतात, तर आपल्याला आई–बाप, भाऊ–बहीण, बायको–मुलं, यांबाहेर आपल्या कुटुंबाची कक्षा वाढवतां येत नाहीं;...ते देशादेशाचे जिव्हाळ्याच्या स्नेहाचे संबंध जोडतात, तर आपण माणसां माणसांच्या ( फार तर लांबलांबच्या नातेवाईकांपर्यन्त ) आपल्या गोतावळ्याची यादी करतों;...त्यांच्या भावना, त्यांचें प्रेम;—अगम्य, दूरदूरच्या अदृश्य ध्येयांनीं प्रेरित असतें, तर आपल्या भावना, आपलं प्रेम, प्रत्यक्ष आकलन करतां येणाऱ्या गोष्टी, व्यक्ति...यांच्या भोंवती घुटमळतें;... त्यांचा त्याग स्वार्थरहित, सामाजिक, विश्वव्यापी असतो, तर आपला त्याग स्वार्थी, व्यक्तिगत, मर्यादित असतो;....त्यांना वैयक्तिक अपेक्षा नसतात, तर आपल्या मनांत मुग्ध– स्पष्ट कोणत्यातरी पेहरावांत तसल्या अपेक्षा वावरत असतात;...त्यांचं सुख–दुःख

त्यांना ध्येयमार्गातून विचलित करीत नाहीं, तर आपली लहान सहान सुखदु:खेंही आपल्याला सुख–विषादानें कांहीं काळ तरी सुन्न केल्यावांचून रहात नाहींत !–याचं कारण काय असावं बरं?

मला वाटतं,...या साऱ्या प्रकाराचं कारण– त्यांची जगाकडे पहाण्याची, जगांत वावरतांनाची दृष्टीच आपल्याहून निराळी असते ! साध्या सुध्या क्षणभंगुर भावना किंवा टिकाऊ प्रेम या बाबतींत त्यांच्या–आपल्यांत दिसून येणारी ही तफावत मोठी विचार करण्यासारखी असते. पहा···एखादं झुरळ आपल्या अंगावर उडून आलं तरी आपण भीतीनं ओरडूं; पण त्यांची भीति मानवी प्रगतीच्या सुखाच्या मार्गात कांटे पसरलेले आढळले तरच काय ती क्षणभर जागृत होईल;... साध्या गोष्टींतही आपल्या मनाविरुद्ध घडलं तर आपण बेफाम होऊं; पण त्यांच्या रागाला निरामय जागतिक सुखाविरुद्ध घडणाऱ्या गोष्टीच तेवढ्या कारणीभूत होतील;... साध्या सुध्या स्वार्थी फायद्यासाठीं आपण लाचारपणा दाखवूं. पण ते आणीबाणीच्या वेळीं सामाजिक हितासाठीं मानाची विनंती करतील ! तीच गोष्ट इतर अनेक बाबतींत ! आपल्या स्वार्थाविरुद्ध येणाऱ्या कोणत्याही लहान मोठ्या व्यक्तीविषयीं, वस्तुविषयीं आपल्याला पटकन् तीव्र तिटकारा येईल, पण ते अनीतिमान, देशद्रोही लोकांविषयींच अनुकंपाजन्य तिरस्कार दाखवतील. क्षुद्र फायद्यासांठीं आम्ही कोठेंहि मान वाकवूं, पण ते त्यांच्याहून कनिष्ठ व्यक्तीपुढेहि वेळीं विनयानें नमतील;.... आपल्याहून फाटका पाहिला म्हणजे आपण



अरेरावी सुरु करूं, पण ते राष्ट्रकल्याणासाठीं, हक्कानें व आत्मविश्वासानें, त्यांना योग्य वाटणारा हुकूम साऱ्या समाजालाहि करतील. 'राजा भिकारी माझी दिडकी घेतली' असल्या प्रकारची संपत्ति–वैभवाकडे पहाण्याची आपली चढेल व क्षुद्र दृष्टी असेल; पण त्यांना आपल्या अंगचे गुण...आपलें तपोबल हींच संपत्ति वाटेल ! .. रस्त्यावर पडलेलं शेंबडं, अंत्यजाचं मूल पाहून आपल्याला आपल्या घरच्या प्रिय बाळाची सहसा आठवण होणार नाहीं ! आपल्या वाटेला येणाऱ्याला हाणून कसं पाडायचं याचे बेत करणं ही देखील आपण आपली मोठी कारागिरीच समजूं. पण जगाच्या सर्वांगीण उन्नतीच्या त्यांच्या योजना आमरण अव्याहत चालू रहातील. रस्त्यांतून चालतां चालतां धोतराचा सोगा पायांत अडकून एखादा लठ्ठ मनुष्य एकदम उताणा पडला तर आपण आपला आपत्काळ क्षणभर विसरून मनुष्याला नैसर्गिक असें मोठ्या मोठ्यानें हंसूं, पण ते उलट पटकन् पुढें होऊन त्याला उभा करतील. त्यांच्या तोंडावरही अस्पष्ट मंद स्मित झळकेल हें खरं; पण त्या मागची त्यांची प्रत्यक्ष सहानुभूति पाहून त्या पडत्या काळांतील माणसालाहि नवा उत्साह वाटेल !

अशा एक ना दोन अनेक लहानसहान नैसर्गिक भाव भावनांतहि, आपल्यांत व त्यांच्यांत दिसून येणारा हा फरक ! आपल्याच हातून होणाऱ्या या त्यांच्या साऱ्या गोष्टी ! पण त्यांना दिव्यत्व आलेलं असतं. त्यामागें किती तरी संयम असतो ! आपण विकारी, वरवर ढोबळ दृष्टी ठेवणारे, चंचल बहिर्मुख असतों.

प्रत्यक्ष तात्कालिक सुखदुःख फायदा– तोटा यांकडेच आपण सारखं पाहातों; तर ते विचारी, खोल, सूक्ष्म दृष्टीनें पहाणारे, स्थिर व अंतर्मुख असतात. दूरवरच्या कायम सुख–दुःखाची-फायदा तोटयाची ते पटकन् कल्पना करतात आणि त्या रोखानें योग्य तें आचरण ते करूं शकतात. आपल्याला शाब्दिक बंबाळ आवडतो. तर ते शद्बांपेक्षां त्यांच्या अर्थाला, वाक्यापेक्षां त्यामधील कल्पनेला, भाषणापेक्षां आचरणाला जास्त किंमत देतात. आपण आत्म–हित–रत असतों तर ते अखिल मानव-हित-रत असतात.

आणि म्हणूनच डोंगरीची टेंकडी चढतांनाहि टिळक धीर-गंभीरवृत्तीनें हंसत होते. जिवंतपणींच गांवांतून तिरडी फिरली तरी आगरकर आपला आत्मविश्वासनिष्ठ सुधारकी जिवन्त बाणा सोडीत नव्हते. पुढील सर्व गोष्टींची पूर्ण कल्पना ठेऊनच मिठा-सारख्या क्षुल्लक गोष्टीचें कारण काढून, गांधीजी दांडीची धिमी वाट चालत होते! . . . प्रिय पत्नीच्या आजारांत, किंबहुना तिच्या मृत्युनंतरहि लागलीच, जवाहिरलाल आपले समाजहिताचे विचारशील आराखडे तयार करीत होते. एकरंगी व अनेकरंगी समित्यांचा गोंधळ, पुढाऱ्यांची यादवी व हिलटरशाही प्रत्ययास आल्यावर दांभिकांच्या हातची कळसुत्री बाहुली होऊन राहण्या-पेक्षां 'पराजयांतहि पराक्रम असतो' असें सुभाषबाबू देशाला दाखवीत होते. स्वतःच्या हालअपेष्टा धाब्यावर बसवून लेनिन आपलें समाजघटनेचें व समाजस्वाथ्याचें नवें शास्त्र जगांत ढक-लीत होता. रणांगणावर तृषित होऊन पडलेला फिलिप सिडने



आपल्या हातांतील पाण्याचा पेला. . . दुसऱ्या मरणोन्मुख सैनिका-पुढें करून, शेवटच्या घांपा टाकीत म्हणत होता, "तुझी जरुरी माझ्यापेक्षां जास्त आहे!"

आणि मग, आपल्याला जें सहजासहजीं शक्य होईलसं वाटत नाहीं, तेंच सारं असं त्यांच्याकडे प्रत्यक्ष दिसलं म्हणजे त्याच्याविषयींच्या आदरानें त्यांच्यावर अतिमानुष दैवी अंशाचा आपण आरोप करतों! आपल्या कल्पनेच्या टप्प्याबाहेरील गोष्टींना असें देवत्व देणें हें मानवी स्वभावाला नैसर्गिकच आहे! पंचमहा-भूतांची भक्तीनें पूजा करणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या पुरातन इतिहासाची ही पुनरावृत्तीच नव्हे का?

पण मला वाटतं–असं आपण आपल्याला तुच्छ मानणं योग्य नव्हे!— तें नैसर्गिकहि नव्हे!—साराच मानवी समाज केवळ अशा थोर व्यक्तींनी भरला तर त्याचं मनुष्यत्व तरी कोठें राहिलं? तो अतिमानव समाजच होईल! तें कल्पनेंतील अगर तुरळकच वावरणारें दिव्य देवत्व त्याला प्राप्त झालें कीं त्याची मानव समाज ही संज्ञाच मुळीं नाहींशी होईल नाहीं का?—

आणि ह्यामुळेच मला वाटतं, ह्या दिव्य असामान्य व्यक्तीं-इतकेच आपल्यासारख्या सामान्य स्वार्थी माणसांनाहि ह्या मानवी समाजांत फार महत्वाचं स्थान आहे!—

## मानवी समाज : ३
# तुम्ही आम्ही

अगदीं साधारण मनुष्य कधीं कधीं असा भावनांच्या लाटांत सांपडतो आणि समाजासाठीं क्षणिक मोठे स्वार्थ-त्याग करूं पहातो !—पण तें त्याचं उसनं अवसान फार वेळ टिकत नाहीं. थोड्याच वेळांत तो हैराण होतो ! आणि मागूनहि यदाकदाचित त्याच्यांत ती वृत्ती दिसत असलीच, तर ती बव्हंशानें दिखाऊ-दांभिक असते !—अर्थात्‌च समाजाला ती निरुपयोगी असते.

वास्तविक,... तो त्याचा प्रांतच नव्हे ! त्यापेक्षां आपल्या भोंवतीं, आपल्या योग्यतेप्रमाणें व कुवतीप्रमाणें लहानमोठा प्रेमसागर निर्माण करून, त्यावर निर्मत्सरबुद्धीचं शीड लावलेली माणुसकीची होडी, सहिष्णुतेच्या व सहानुभूतीच्या वल्ह्यांनीं वल्हवणारा साधासुधा निर्मळ संसारी स्वार्थी मनुष्यच जास्त चांगला !—

हो, मी म्हणतों तें तुम्हालाहि विचारांतीं पटेल ! तुमच्या-माझ्यासारखा स्वार्थी मनुष्यच जास्त चांगला !—



कारण आपल्याहून श्रेष्ठ माणसें तरी कोणतीं हो ?—'स्वार्थ-त्यागी जविन जगतात तीं ! '

उत्तर थोडंसं खरं आहे. अशीं माणसं, आपल्या श्रेष्ठ व्यक्तित्वाच्या जोरावर जास्त मोठ्या नव्या लाटा समाजांत अधिक प्रमाणांत सोडतील हें खरं !—हीं दृश्यें आपण पूर्व इतिहासांत व चालू काळांतहि कांहीं कांहीं वेळां पहातों !—नाहीं असं नाहीं...पण अशीं खरोखर स्वार्थत्यागी माणसें आपल्याला किती सांपडतील ?—

आपल्या आपणच एकदम आलेलं उत्तर द्या हं मात्र !—खोल विचारानें मनुष्य पुष्कळदां उलट फसतो !

माझं उत्तर ठरलेलं आहे, म्हणूनच मी मघांहूनहि जास्त विश्वासानें व विचारानें पुन्हा म्हणेन, कीं ' साधींसुधीं स्वार्थी संसारी माणसंच जास्त चांगलीं ! '—

कारण असं पहा—मोठा त्याग करायला मनुष्य स्वतः खरोखरच मोठा असला पाहिजे ! त्याला सहज हस्तगत असतील किंवा होऊं शकतील अशा मोठ्या गोष्टी तरी त्याच्यापाशीं पाहिजेत ना ?—

' वेल्स परगण्यांतील बेकारी व गरीबांचीं दुःखें या बाबतींतील अनास्था ' हें पडद्यामागील कारण आपण क्षणभर बाजूस ठेऊं या. पण अधिकृतरीत्या पुढें आलेलं कारण पाहिलं तरी ' आपल्याला आवडणाऱ्या स्त्रीच्या प्राप्तीसाठीं ' कां होईना जगांतील श्रेष्ठ साम्राज्याच्या राजपदाचा त्याग करणाऱ्या किंग

वर्डचं उदाहरण, चालू घटकेलाच आपण पाहूं शकतो. या घटनेविरुद्ध सकारण किंवा अकारण निरनिराळे फुत्कार सोडणारेहि अनेक सांपडतील;–पण मग हा एखाद्या किंग एडवर्डचा किंवा दुसऱ्या ' क्वीन ख्रीस्तीना'चा वैयक्तिक झाला तरी खासच लहानसान त्याग नव्हे !—

तें दुसऱ्याच्या घरांतलं उदाहरण बाजूस ठेऊं पाहिजे तर आपण; आणि आपलेच जवाहिरलाल नेहरू घेऊं. त्यांच्या गर्भश्रीमंतीच्या साक्षीसाठीं पॅरीसमधील धोबी धरून आणले जातात किंवा पूर्वींच्या युवराज एडवर्डच्या सहाध्यायित्वाच्या अफवाहि उठविल्या जातात. त्यांतील खरेंखोटेंपणाचा अंश, त्यांच्या आत्मचरित्रावरून आपल्याला आतां समजलाच आहे.– पण तरी त्या पिता–पुत्रांचा आपल्या देशासाठीं झालेला व होणारा त्याग मोठा, याविषयीं (त्यांच्या राजकीय मतांविषयीं कसलाहि मतभेद असला तरी) आतांची जवाहरांची फकिरी पाहून, फारसं दुमत खास होणार नाहीं !

— नाहीतर याच शहरांतल्या एखाद्या ऑफिसमधल्या मधल्या फराळाच्या वेळीं, त्याजवळच्या इराण्याच्या हॉटेलांत जो कारकूनकंपू जमेल, त्यांच्या जवळचं एखादं टेबल गांठा व तेथें तुम्हीं थोडा वेळ ऐकत बसा !– ' पंत मेले– व राव चढले,'–हेंच दृश्य बहुतेक ठिकाणीं ऐकूं येईल–आढळेल !– किंवा फार लांब कशाला, चुलीवरचं दूध ऊतूं गेलं, तरी 'अग्नये



स्वाहा', म्हणून ठमाबाईंना सहजासहजीं त्याग करतां येईलच कीं !—

म्हणूनच मी म्हणतों, बोटावर मोजावयाच्या कांहीं असामान्यांचा प्रश्न, आपणां सामान्यांना नकोच मुळीं !– साधीं निर्भेळ संसारी स्वार्थी माणसें ज्या समाजांत जास्त प्रमाणांत वावरत असतील, तोच समाज जास्त प्रगतीपथावर आहे, असं मला वाटतं— ( येथें सध्यांची विषम समाजघटना, पुढारलेल्या संस्कृतीचा दांभिकपणा वगैरे सांधे जोडून, आपली ही विचारांची गाडी कृपा करून दुसऱ्या रुळावर नेऊं नका ! )

— कारण सगळेच असे स्वार्थत्याग करूं लागले, तर मग समाजांत स्वार्थ तरी कोणी साधायचा ? –

आणि तुम्हीं समाजांतील खरे स्वार्थत्यागी समजतां ते निवडून तर काढा; मग त्यांनाच विचारलेत तर ते सांगतील, कीं त्यांच्या जीवनाची सारी धडपड, शेवटीं, त्यांच्या समाजांतील प्रत्येक घटकाच्या निरामय व हक्काच्या स्वार्थाकडेच रोखलेली असते !–

एवढ्याचसाठीं, मी म्हणतों तुमच्या–आमच्यासारख्या साधा माणसांची सारी धडपड जी स्वार्थासाठीं असते, ती तशीच असावयास पाहिजे !–

# क्षुद्र त्याग

' माणसानें मुख्यतः स्वार्थी असावें ' असं प्रथम ह्मटलं, तरी त्यागाची कल्पनाहि त्याच्या मनांत नैसर्गिकच आहे.— ' Man is a social animal ' असं ह्मटल्यावर, त्यांतच हें सत्य तत्त्व स्पष्ट बिंबित झालेलं दिसेल. कारण कळप करून राहणं ही देखील सोपी गोष्ट नव्हे !– किंबहुना, त्यामुळेंच आपला खरा स्वार्थ जास्तींत जास्त फळास येण्यासाठीं माणसाला पावलापावलाला त्याग करीत रहावं लागतं !— त्याग व स्वार्थ यांचीहि जोडीच अशी अगदीं न्यारी आहे. ती हातांत हात घालूनच मानवी समाजांत फिरते !—

आतां हे त्याग लहान माणसांचे ह्मणून लहान प्रमाणावरचे दिसतील. पण तरीहि ते अत्यंत महत्वाचे असतात, श्रेष्ठ असतात. सानसान केंद्रांतील व त्या त्या घरगुती कक्षेंतील हे त्याग काय कमी योग्यतेचे असतात !–ते त्या त्याग करणाऱ्या व्यक्तीला किंवा जिच्या बाबतींत ते केले असतात त्या व्यक्तीला काय कमी सुखी करतात ?



याबद्दल पुरावेच कशाला शोधायला पाहिजेत ? कोठेंहि दृष्टी फिरवा. तुम्हाला ते पदोपदीं आढळतील. तुमच्या घरांत डोकावलांत तर तुह्मालाहि तेंच दिसेल—

तुमचेंच लहानपण आठवा ना !. . एखाद्या दिवशीं भाजी फार स्वादिष्ट झाली असेल; आईनें प्रथम दोनतीनदां वाढूनहि तुह्मी आवडीनें ती आणखी एकदा तिच्याकडे मागितली असेल. त्या वेळीं, सतीनें किंवा आवडीनें– तुमच्या पलीकडे बसलेल्या दादाताई दोघातिघांनीहि– एकदम मागणी केल्यामुळें, आईनें मग सर्वांनांच ती हंसतमुखानें पुन्हा आणून वाढली असेल – आणि मग हसत खेळत जेऊन झाल्यावर तुह्मी आंचवलां असाल; पण त्यानंतर थोड्या वेळानें खेळत खेळत पाणी प्यायला म्हणून घरांत गेलां असाल– त्यावेळीं तेथें तुम्हाला दिसलेलं दृश्य ?. . .

खरकट्या भांड्यांच्या पसाऱ्यांत आई जेवायला बसली आहे. तुमच्याचपैकीं कोणाचं तरी जेऊन झालेलं उष्टं ताट तिच्यासमोर आहे; पण त्यांत भाजीची जागा रिकामी, समोरचा टोप अगदीं पुसून कोरडा, आणि आई नुसत्या आमटीनें किंवा मिठांतल्या आंब्याच्या फोडीबरोबर निमूटपणे जेवत आहे.

तुम्ही पाहिलेलं व अनुभवलेंलंच हे दृश्य !

किंचित अपराधी मनानेंच तुम्ही भांबावून गोंधळलां असाल; . . अर्धवट तिच्याकडे पहात बाहेर पळतां पळतां तुम्ही तोंडातल्या तोंडांत, निरर्थकपणें हेतुपूर्ण प्रश्न विचारला असेल— 'आई, झालं ग जेवण ? ' त्यावेळीं, वर वळून तुमच्याकडे मुग्ध-

पणें प्रेमळनजरेनें पहाताना तिच्या चेहऱ्यावर झळकून गेलेलं स्मित तुम्हाला आठवतं कां ऽ—

आणि स्वतःचे कपडे स्वतःला दाटत असूनहि तुमच्या आवडीप्रमाणें 'शर्ट–शॉर्ट कोट' शिवून ते तुमच्या अंगावर शिंपी चढवीत असतांना, तुमच्या बाबांनीं तुमच्या लहानपणी लावलेली दृष्टी तुम्हाला आठवते कां ?— अगदी गर्भश्रीमंतींतच वाढवले-ल्यांचे सोडून देऊं आपण !—पण तुम्ही अगदीं मध्यम स्थितीं-तील कुटुंबांत वाढलेले असाल तर कसलींही तुमच्याच आयु-ष्यांतील अनेक दृश्यें तुमच्यापुढें माझ्याप्रमाणेंच पटकन् उभीं राहतील !—

माझ्या एका स्नेह्याच्या शेजारीं एक गृहस्थ रहातात. इतकीं वर्षें पहातों आहे मी—पण त्यांचं नऊवारी धोतर शेवटीं शेवटी तर अनेक ठिकाणीं फाटून ठिगळ्या मागतं ! . . दिवसेदिवस त्याचा रंग पालटत जातो; पण कोणी त्याविषयीं त्यांच्याकडे फारच तक्रार केल्याशिवाय ते तें बदलणार नाहींत ! त्यांच्या अंगांतील तो ठिगळ्या लावलेला कोट, मी तरी चार वर्षें—( त्याहून जास्तच काळ )— पहात आलों आहे !— त्यांच्या जरीच्या मूळ तांबड्या पण हल्लीं रंग पालटलेल्या– फेट्याला तर पगडीप्रमाणें झिळमिळ्याच सुटल्या आहेत अलिकडे !— पण घरांतील साऱ्या मुलांमुलींचे कपडे, खाणं पिणं, शिक्षण सर्व पहा !— सारं अगदीं सुरळीत चाललं आहे.— परवांच मला समजलं, . . . त्यांचा मोठा मुलगा पुण्यास कॉलेजांत असतो



म्हणे. आमचे बाबुराव त्यांच्याच ऑफिसांत कामाला जातात, म्हणून मी सहज त्यांना त्या गृहस्थाच्या पगाराविषयीं विचारलं; ते म्हणाले, "एकशें दहाची ग्रेड– सध्यां ऐशीं मिळतात मला वाटतं !—"

आणि तुमच्या शेजारचे ते राजाभाऊ !–ते तरी इतकीं वर्षे पहातांच आहां ना तुम्ही ?–आतां पन्नाशी सहज उलटून गेली असेल त्यांची ! ते दोघे भाऊ ! आतां आतां म्हणजे सहासात वर्षांपूर्वींपर्यंत दोघे एकत्रच रहात होते. आणि तें एकत्र कुटुंब आपलंच घर म्हणून, त्यावेळीं राजाभाऊहि सारा खर्च स्वतःच करीत.—पण मग त्यांच्या वयाला उतार लागल्यावर, एकदम असं काय झालं कोणास ठाऊक ?—तुमच्या शेजारीं रहायला येण्यापूर्वी, पांचसहा महिनेच अगोदर, घरामध्यें बायकाबायकांचं काय एकदम बिनसलं; आणि त्या दोघां भावांची कायमची ताटातूट झाली !–चमत्कारिकच घटना; पण घडली खरी !—त्यांत विशेष वाईट म्हणजे, त्यापूर्वींच थोडे दिवस, राजाभाऊंचा पूर्वींचा व्यापारधंदा साफ बसून, त्यांची जवळ जवळ अगदीं बेकार स्थिती झाली होती.—आतां दोघेहि भाऊ प्रथमपासून मिळवते ! . . . पण राजाभाऊ ज्येष्ठ म्हणून त्यांनीं घरांत ठेवलेल्या आतांपर्यंतच्या रहाणीमुळें त्यांच्या पदरीं कसली शिल्लक म्हणून मुळी राहिली नव्हती !-होत्या शिल्लक त्या दोन लग्नाच्या मुली ! जगाच्या व्यवहारी दृष्टीनें पांच पांच हजारांच्या दोन हुंड्या !–

अर्थात् नवी विटी नवा दांडू या न्यायानें, संसाराच्या साध्या श्रीगणेशास, चाळीशी उलटल्यावर, तुमच्या शेजारच्या घरांतच राजाभाऊंनीं फिरून सुरवात केली!-वडिलार्जित नाहीं पण त्यांच्याच हातानें थाटलेल्या त्यापूर्वीच्या एकत्र बिऱ्हाडांतील संसारापैकीं जो भाग त्यांच्या वाटणीचा म्हणून त्यांच्या धाकट्या भावजयीनें पुढें ठेवला, त्यांतील मोडके पाट, फुटकीं भांडीं, पिचक्या फुंकण्या, वगैरे सामानाकडे पाहून, राजाभाऊंनीं दुःखानें आपली मान बाजूला फिरवली! एका हातानें आपले ओले झालेले डोळे निमूटपणें पुसले; आणि दुसऱ्या हातानें, आपल्या वडिलांच्या हातचा पोंग आलेला जुना तांब्या तेवढाच त्या सामानांतून उचलून ते नव्या बिऱ्हाडीं आले व त्याचा शेजारी उधारीनें खाल्यावर आणलेली पितळी चकचकीत भांडी भरली!—

आतां गेलीं दोन वर्षेंच काय ती, ते पुन्हा थोडेफार सांवरले आहेत!... मला वाटतं, वयाच्या मानानें सत्रा भानगडी करूनच ते आपले व्यवहार, कसेबसे ढकलत!—आपल्या भावाप्रमाणें त्यांचं अजून स्वतःचं नवं घर झालेलं नसलं, तरी स्वतः रहात असलेल्या जुन्या धराच्या भाड्याची पोंच मात्र त्यांच्याकडून दरमहाच्या दरमहा वक्तशीर व खात्रीनें होते!— आणि नाहीं नाहीं म्हणतां त्यांच्या दोन मुलींच्या लग्नाच्या हुंड्या पटविण्यासाठीं काढलेली कर्जाऊ रक्कम, गेल्या सहा सात वर्षांत त्यांनीं फेडीत आणलीच आहे ना?



पण हें सारं मी तुम्हांला सांगेपर्यंत, स्वतः च्या मोठेपणासाठीं किंवा भावाच्या कमीपणासाठीं, राजाभाऊंच्या तोंडून यांतलं कांहीं तुम्हांला ऐकायला मिळाले होतें कां?— नसेलच मुळीं! त्याऐवजीं, तें सारें मनांतल्या मनांत ठेवल्यामुळें, राजाभाऊंच्या वयापेक्षां जास्त म्हाताऱ्या दिसणाऱ्या चेहऱ्यावर त्या एकाच प्रकारच्या गंभीर मुद्रेची छटा तेवढी दिसली असेल तुम्हांला!—

पण मग या असल्या जंत्र्या मीच कशाला तुह्मांला द्यायला पाहिजे?—असल्या 'सुपाऱ्या' किंवा 'शेवग्याच्या शेंगा' शोधायला वाङ्मय नको कांहीं धुंडाळायला! खरं वाङ्मय जीवनावर आधारलेलं असतं! त्या वाङ्मयाची मूळ जिवंत प्रत म्हणजे जग!—आणि त्यांतील त्याच जीवनाशी तुमचा आमचा दिवसांतून चोवीस तास संबंध येत असतो! फक्त डोळे उघडे पाहिजेत! आणि मुख्य म्हणजे माणसाचं मन शाबूत पाहिजे! सामान्यांचें दिव्यत्व शोधावयास निराळाच चष्मा लावावा लागतो!—

—मग अनेक माणसं तुम्हाला स्वार्थी दिसतील!— तितकींच ती त्यागीही सांपडतील!—

# माणुसकी आणि व्यसन

हीं चित्रें आणि तीं चित्रें--जगांत वावरतांना दोन्ही कांहीं विलग विलग आढळणार नाहींत आपल्याला !—आपलं आयुष्य या दोन्ही प्रकारांत... त्या दरम्यानच घुटमळत असतं.

आपण लहान लहान कक्षेंतील स्वार्थत्याग करावयाचे म्हटलं तरी आयुष्यांत कधींतरी आपापल्या मर्यादित कुवतींत, ध्येयप्रवणतेनें, निस्वार्थीपणें लहानमोठ्या खपुष्पाला हात घालण्याचा व तें खुडण्याचा प्रयत्न आपण करतोंच करतों !—त्यावेळीं,—अतिशय उच्च ध्येयानें प्रेरित होऊन 'सारी खटपट यशस्वी करून दाखवूं' अशा उमेदीनें व आत्मविश्वासानें एखाद्या विशेष महत्वाच्या अशा मोठ्या कामास आपण हात घालावा !—पण मग; भोंवतालचा थंडपणा, बेफिकिरी, प्रतिकूल परिस्थिती, अकारण द्वेष, दुर्दैवाचा अचानक कोप व आपलीहि कांहीं अंशीं मर्यादित कुवत, यामुळें तें एकदम मध्येंच अर्धवट स्थितींत नासावं !—आयुष्याच्या मध्यापूर्वींच



आपण असं अपयशाचं धनी व्हावं !—केवढं नैराश्यपटल येतं मनावर म्हणतां ?

अशा वेळीं, या साऱ्या परिणामांच्या प्रतिक्रियेनें आपण अनैसर्गिक, अस्वाभाविक कठोर बनलेलों असतों !—आणि त्यामुळें आपण इतके आत्मकेंद्रित होतों, कीं भोंवतालच्या साऱ्यांकडे पहातांनाची आपली उगीचच कुत्सित झालेली दृष्टी, त्यांच्या व आपल्या लहानसहान सुखाबद्दल आपल्याला मनांत वाटणारी तुच्छता, सारं कांहीं ... प्रतिक्षणीं वाढत जातं ! ... आणि आपण जें चांगलं, श्रेष्ठ समजत होतों, त्यांतच अपयशी झालों !— पण हीं सारीं मात्र —

आपलं मन अत्यंत रंजीस होऊन आपल्याला वाटतं, ... कलकलाट करणारा मानवी जमाव आहे खरा हा ... पण यांतील किती जणांना या क्षणीं माणसाचं मन आहे ?—आपण स्वतःलाहि क्षणभर मूर्ख ठरवून मनाशीं म्हणतों— "after all self--sacrifice is a luxury !"

अशाच एखाद्यावेळी आपल्याला वाटतं, याक्षणीं आपल्या-भोंवतीं सिगारेटच्या धुराचे लोळ पसरलेले असावेत !— अगदीं तीव्र इच्छा होते त्यावेळीं !— या चमत्कारिक निराश मनःस्थितीमुळेंच या सिगारेटच्या लोळांबरोबर कित्येक नवीन विचारकल्लोळ उसळतात; तर कित्येक मागल्या मागें शून्यत्वांत विलीन होऊन गारद होतात !— त्या वलयांमुळें, आपल्या विचारांत आपली जी एक क्षणिक तंद्री लागते, व क्षणभरच कां

होईना, जें एकप्रकारचं सुख होतं, तेंच माणसाला महत्वाचं वाटतं,... समाधान देतं! एवढ्याचसाठीं, त्याला मग त्या गोष्टीची चटक—संवय—व्यसन लागतं!

'व्यसन' म्हणतांच, इथं तुमच्या तोंडावर शब्द आले असतील,... 'बाकी व्यसन एकंदरींत चांगलं नव्हे!'—हो, असं मीहि आपल्याबरोबर प्रथम म्हणतों!... पण तें मनापासून मात्र नव्हे!—

कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक बरा नव्हे खरंच! आणि मद्यामुळें, जुगारामुळें, स्त्रीमुळें,... धुळीस मिळालेलीं कुटुंबेहि आपण अनेकदां पहातों!... पण तरीहि मी म्हणेन, लहानमोठ्या साऱ्या व्यसनांत, त्या त्या दृष्टीनें कमीजास्त प्रमाणांत, माणसाला अत्यावश्यक असा क्षणिक उन्माद, धुंद आनंद, बेफिकीर समाधान,... लाभत असतं! आणि तें पाहिजे असल्यास व्यसन निखालस वाईट, असं म्हणूनहि आपल्याला चालणार नाहीं!

आजच्या दारुबंदीच्या काळापर्यंत, अनेक वेळां कुतूहल जागृत होऊनहि मी अजून मद्यपान केलं नाहीं. त्यापुढील पायरी गांठण्याची मला इच्छा झाली नाहीं. पण इतर लहानसान अनुभवांवरून मला वाटतं, मद्यपान करणारा मद्यपी घ्या, किंवा धूम्रपान करणारा धूम्रपी घ्या, त्या त्या गोष्टींचा आनंद तो अगदीं आवडीनें आस्वादितो,... तो त्या विशिष्ट वस्तुगत कांहीं असते म्हणून नव्हे. हा मुख्यत:-(कां? सर्वस्वीच!)- संवयींचा प्रश्न असतो!... शेवटीं त्यालाच विचारा!—ती त्याची पहिली



धूम्रनलिका, तो त्याचा पहिला मद्यप्याला,... त्याला आनंददायक खासच झाला नव्हता!... त्यानें ती अगदीं foreign matter म्हणूनच घशाखाली ढकलली होती!—पण त्यानंतर, त्याला त्यामुळेंच, जरूर वाटणारी एकाग्रता, एक प्रकारचं तें तात्कालिक समाधान व उन्माद, किंचित् अगदीं क्षणभर जगाला विसरल्याचं तें बेफिकीर वातावरण मिळूं लागलं!... यामुळेंच त्याला त्या वस्तूची वारंवार आठवण होऊं लागली;... त्याविषयींची त्याची आपुलकी वाढूं लागली;... व शेवटीं, त्याला त्या वस्तूची संवय जडली!—आणि त्या वस्तूचा त्याच्या कमीजास्त जरुरीप्रमाणेंच त्याला तिचं कमीजास्त व्यसन जडलं शेवटीं!—

आणि म्हणूनच—माणसाला कोणतंच व्यसन असूं नये किंवा कांहींतरी व्यसन असावंच, या दोन बाजूंपैकीं मी येथें कांहींच प्रतिपादण्याचा प्रयत्न करीत नाहीं!-कांहीं कांहीं वेळां तर एकाच व्यक्तीच्या आयुष्यांतहि तेंच व्यसन अत्यंत आवडीचं अगर पूर्ण तिरस्करणीय झाल्याचं आढळतं. अशी उदाहरणें अगदींच विरळा नव्हेत!—मी स्वतःच डोळ्यानें पाहिलीं आहेत!—

मला एवढ्याचसाठीं म्हणावंसं वाटतं, कीं, हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक दृष्टिकोणाचा, परिस्थितीचा, व तद्भव जबाबदारींना तोंड देण्याचा त्याचा स्वतःच्या जबाबदारीचा प्रश्न आहे. जोंपर्यंत आपल्या असल्या व्यसनांनीं तो दुसऱ्याला दुःखी करीत नाहीं, त्यांना धोक्यांत आणीत नाहीं, व मुख्य: म्हणजे

स्वकर्तव्य विसरून, स्वतःला महत्भाग्यानें लाभलेल्या मानवी आयुष्याचा, केवळ असल्या आळशी उद्योगांतच घातकी नाश करीत नाहीं... तोंपर्यंत, व्यसनाचें बरेंवाईटपण ठरविण्याची ही बाब केवळ त्याची स्वतःचीच असते !—

कारण अनेकवेळां, व्यसनानें माणुसकी गेलेली आढळली, तरी व्यसनाच्या असण्यानसण्यावर माणुसकी खासच अवलंबून नसते! व्यसनी माणसांच्या यादींत जरा देखील पडणार नाहींत असे कांहीं महाभाग, पशूंहून जास्त निराळे नसतात! कधीं कधीं तर पशूलाहि ते कमीपणा आणतात! उलट कांहीं अत्यंत व्यसनी माणसें निरुपद्रवी, लोकोपयोगी, उदारमनस्क व सरलहि आढळतात!— मग या दृश्यांवरून व्यसन व माणुसकी यांचें कोष्टक तरी कसें मांडतां येणार ?—

—आतां हेंच पहाना !— मी कांहीं तसा मोठा पट्टीचा 'धुरकटणारा' नव्हे— पण आज याक्षणीं मी धूर सोडीत आहें! कां ?—माझं मलाच सांगतां येणार नाहीं नक्की !—

पण घडलेला प्रसंग मात्र सांगतों—

माझ्या सौजन्यामुळें, बरेच दिवस माझे कांही पैसे बाहेर गेले होते. सौजन्यामुळेंच, निमूट बसून शेवटीं मी ते बुडीतखातीं जमा केले होते. पण अगदीं अनपेक्षितपणें आज चार वर्षांनीं, पूर्वी 'दोस्त' ह्मणविणाऱ्या त्या माझ्या बेफिकीर ऋणकोनें, त्याला आज लॉटरी लागली होती ह्मणून, कांही पैसे आणून दिले. माझ्या रकमेपैकीं निम्मे पैसे होते ते !—माझी रक्कमहि कांही तशी



विशेष मोठी नव्हती ! सारी वीस रुपये ! त्याला लॉटरी लागली होती शंभर रुपयांची.

वास्तविक त्यावेळीं किंवा यापूर्वीहि माझी सारी फेड त्याला करतां आली असती. चांगली साठ रुपये पगाराची नोकरी— आणि अजून अविवाहितच होता तो!...त्याच्या सर्व हौशी नियमानें चालत होत्या दरम्यान,...पण मला मध्यें अतिशय जरुरी भासत असल्याचं त्याला ठाऊक असूनहि, त्यानें मला रस्त्यांत अनेक वेळां जाणून बुजून टाळलें होतें. मीहि मुद्दाम तिकडे कानाडोळा केला होता !—

आणि आज चार वर्षांनंतर तो एकाएकी पैसे घेऊन आला होता !—

आतां, 'एकाएकी शंभराची लॉटरी लागल्यानंतर, चार वर्षांनीं त्यानें मला दहा रुपये आणून देण्यांत विशेष काय आहे !' तुम्ही म्हणाल !—पण मला मात्र त्याबद्दलहि फार आनंद झाला !—राहिलेल्या रकमेविषयींच्या त्याच्या हप्त्याच्या गुळमुळीत आश्वासनावरून तर, त्यानंतर पुढील बाकीसाठीं, पुन्हा त्याला तशी लॉटरी लागण्याचीच मला वाट पहावी लागणार, हें मी बोलतां बोलतां चटकन् ओळखलं !—पण तरी मला वाटलं, 'न लाजतां, मुद्दाम येऊन कांहीं देण्याचं त्यानें आज दाखविलं एवढं तरी सौजन्य त्याच्याकडे आहे हें काय कमी झालं ?— त्याच्या अंगीं तें त्याहून जास्त नाहीं, म्हणून त्याला मी वांकडे शब्द बोलून आतां निदान दुखवूं तरी कशाला ?—'

आणि म्हणूनच, मी त्यानें दिलेली ती दहाची नोट खिशांत कोंबली; त्याच्या वायद्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं; हसत हसत खोलीबाहेर पडलों,... आणि त्याच्या पाठीवर कांहींशा स्नेहानें थाप मारून म्हणालों, "अरे छोड देव यार!– आतां 'डरायस'मधें चहा तर घ्याल?—"

—आणि तेथें थोडा वेळ खातपीत बसून परत येतांना, अचानक आलेले जादा पैसे होते म्हणून मला वाटलं, आज खूपशा सिगारेट्स् ओढाव्यात!–लागलीच 'प्लेअर'चं टिन व काड्याची पेटी घेऊनच खोलीत शिरलों. कोट काढून खुंटीवर ठेवला, त्यावेळीं त्यांत त्या नोटींपैकीं साडेसात रुपयेच होते. काडी पेटवून कॉटवर एकांतांत धूम्रपान करीत पडलो–धूराकडे पहातां पहातां वाटलं लिहावं!–आणि म्हणूनच या प्रसंगाची आतां आठवण झाली!...

पण मला खात्री आहे, कीं हा समोरचा डबा संपल्यावर धूम्रपानाची मला इतकी जबर इच्छा, आतां पुन्हा बरेच दिवस होणार नाहीं!–

आणि तशी इच्छा झाली, तरी तसे चोचले नेहमीं नेहमीं पुरविण्याची माझी आज परिस्थितीहि नाहीं!—

खरंच,...कां बरं इतका आनंद झाला आहे मला आज?– निम्मे पैसे परत करण्यांत-आणि तेहि इतक्या उशीरां–त्यानें कांहीं मजवर उपकार केले नव्हते!...त्याचं तें कर्तव्य, वास्तविक त्यानें यापूर्वींच कितीतरी वर्षें अगोदर पार पाडावयास



पाहिजे होतं!...निदान शंभरची लॅाटरी लागल्यानंतर आज तरी माझे सारे पैसे एकदम देऊन टाकले असतेन् त्यानें मला तरी विशेष काय झालं असतं!

पण त्यानें दाखविली तेवढ्याच माणुसकीनेंहि मला आनंद झाला आहे!... मला अल्पसंतुष्ट म्हणा पाहिजे तर—

पण मग, धूम्रपानाची तीव्र इच्छा झाली मला, ती, नेहमी येणारा कटु अनुभव व नैराश्य-आणि याचा सूक्ष्मपणें दिसणारा सौजन्यांश,...या दोन विरोधी भावनांना दडपण्यासाठींच, मला वाटतं!

खरंच, अशावेळीं वाटतं, प्रत्येकानेंच एवढी तरी माणुसकी दाखवावी!... आपल्यापासून दुसऱ्याला त्रास होणार नाहीं अशाप्रकारें कांहीं प्रमाणांत तरी वागावं!...त्यांत थोडासा उशीर, कांहींशी दिरंगाई झाली एकवेळ, तरी पत्करली!–पण आपलं माणसाचं मन तरी शाबूत ठेवावं!...आपल्याशी संबंध येणाऱ्या साऱ्या व्यक्तींकडे थोड्या सहिष्णुतेनें सहानुभूतीनें पहावं!...–मग त्याउप्पर अर्थातच प्रत्येकाचा प्रत्येक खास मुखत्यार आहे!—

पण इथंच तर घोडं सारं पेंड खातं!–आपण करतों तें चांगलं,...त्या व्यतिरिक्त सारं वाईट, व आपण करतों तें वाईट असलं तरी सारं चांगलं,...आपलं सुख म्हणजेच जणूं दुसऱ्याचं सुख, आपलं दुःख तेंच जणूं सार्वजनिक दुःख,...अशा वृत्तीनें

चालणारीं माणसेंच जगांत फार! आणि त्यांचाच मला फार राग येतो!—

निदान त्यांच्यांत, त्या मघांच्या माझ्या 'दोस्ता' एवढी तरी माणुसकी असावयास पाहिजे नको कां?



# एक प्रसंग

माणसाचं मन शाबूत असलं तर तें कोठेंहि—लहानसान गोष्टींत देखील—प्रतीत होईल!—

तुम्हांला सिगारेट किंवा विडी ओढण्याची संवय आहे का? पहा, एखाद्या वेळीं आपल्या खिशांत विडी सांपडावी, पण काडी सांपडूं नये; तलफ तर भागत नाहीं ती नुसती हातांत धरून!-अशावेळीं,...रस्त्यांतून आजूबाजूनें जाणारा एखादा 'जागतिक बिडी-काडी-मंडळा'चा सभासद आपल्याला भेटावा अशा हेतूनें आपली शोधक दृष्टि भोंवतीं फिरत असते. शेवटीं तो तसा भेटावा, त्यानें खिशांतून पेटी बाहेर काढावी, पण त्यांत अगदीं शेवटची एकच काडी—

पाहिलेत,...यावरून मला एका अशाच प्रसंगाची आठवण होते आहे या वेळीं!...त्या दिवशीं तोहि असाच एका काडीच्या जरुरीमुळें फिकिरींत पडला होता,...आणि मी—

पंचम जॉर्ज बादशहाच्या जुबिलीचा तो प्रसंग!...सारी

मुंबानगरी दिव्यांनीं लखलखत होती. रस्ते गर्दीनें फुलले होते. आणि मी त्याच गजबजलेल्या जनसंमर्दांत चोहूं बाजूंस भटकत फिरत होतों!—

राजाच्या गौरवार्थ चाललेली ती दिवाळी!...ती पहावयास जनसागर लोटला होता,...इलेक्ट्रिक हाऊसपासून तों क्राफर्ड मार्केटपर्यंत मी ती भांबावलेल्या नजरेनें पहात आलों होतों.

शेवटीं मार्केटच्या दाराजवळ तों बसस्टॅन्ड आहे ना, त्याच्या-जवळ मी उभा राहिलों. पायीं चालणारे झपझप चालले होते. पण मोटारींची रांग फ्लोराफाऊंटनपर्यंत व तितकीच मागें लागली होती!—जणूं खोखोचाच खेळ होता तो!-भिडूंनीं वाटेल तिथं भिडावं, वाटेल तिथून धावावं; हार आलेल्या गड्यानें मात्र गिरक्या मारीत रस्ता काटायचा!—मोटारींवर असलं 'राज्य' आलं होतं आज!—

त्या प्रकाराचं मला हसूं आलं,...आणि माझ्या खिशांतील गरिबाऊ सिगारेट काढून मी ती ओढूं लागलों—असल्या एकाकी भ्रमणांत माणसाचे डोळे अगदीं चलाख असतात. माणसाचं मन जिवंतपणें व ग्राहकशक्ती तल्लखपणें वावरत असते!—आणि विचार तर भराभर येतच असतात, एका-मागून एक!—

तसाच उभा राहून मी मुकाट्यानें पहात होतों; त्या चाल-णाऱ्या घोळक्यांची झपझप गती आणि त्या मोटारींच्या लांब-लचक मालिकेंतील प्रत्येक दुव्याची थोडथोडया वेळानें पुढच्या



मोटारीच्या गतीवर अवलंबून होणारी गचकेखाऊ प्रगती, या घट-नेची मला मनोमय गंमतच वाटली!—

आणि केवळ सूडबुद्धीनें मी म्हटलं, "बरं झालं, आतां तरी या लोकांचं नाक खाली झालं कीं नाहीं?—नाही तर पाव-साळ्यांत, आपल्याच वेगांत चाढून, आम्हा गरीब पदचरांना रस्त्यांतील राडीचं सचैल स्नान घालणारीं हीच ती उन्मत्त मोटारवाली मंडळी!—यांची जणूं गाढवी वरातच काढली आहे कोणीतरी यावेळीं!—आणि आजतरी त्यांच्या पुढून दिमाखानें दिल चाहील तसं जाण्याचा मान आम्हाला दिला आहे!—"

या विचारानें मी पुन्हां हसलों. व जळलेली सिगारेट फेकून देऊन, दोन तीन अगदीं 'थंड्या पडलेल्या' मोटारींजवळून, अगदीं मोठ्या रुबाबांत आडवंतिडवं चालत गेलों!....तोंच पुढल्या घोळक्यानें माझीहि गति खुंटली. व मी पुन्हा दुसऱ्या एका ठिकाणीं जाऊन थांबलों!—

समोर पाहिलं, तों एक छोटी 'बेबी ऑस्टीन'!... किती सुंदर!...मालकाची सौंदर्यदृष्टी पुरेपूर दिसत होती तींत; आणि आंत बसलेलें तें तरुण युरोपियन (इंग्लिश असावं, मला वाटतं) जोडपं!...त्यांचा पोषाखहि तसाच सुंदर;...ती मोहक सडपातळ तरुणी त्याला अगदीं अनुरुप अशीच होती!—

तरीहि, त्यांच्या बाजूस मी निर्विकार मनानेंच पाहिलं,.... पण मग व्हीलजवळ बसलेल्या त्या तरुणाची चुळबुळ पाहून, माझं लक्ष पुन्हा एकदम त्यांच्याकडे वेधलं!—

—त्यानें एक सिगारेट तोंडांत धरली होती; पण ती पेटलेली नव्हती !—तो कावराबावरा इकडेतिकडे पहात, ती सिगारेट तशींच तोंडांत धरल्या धरल्या, जाणाऱ्या येणाऱ्याला, दोन्ही हातांनीं खूण करीत, अर्धवट बोबड्या शब्दांत पुन्हा पुन्हा प्रश्नार्थक विचारीत होता—" मॅऽऽऽ अबॉऽऽ? मॅऽऽ अबॉऽऽ?"

एक कोंकण्या आपल्याच नादांत दिव्यांचा लखलखाट पहात निघून गेला. धोतराचा सोगा हातांत धरून चालणारा एक गुजराथी भाई, तोंडांतील 'हिरवा धागा' फेंकून मोटारीकडे धूर सोडीत ओझरतं पाहिल्यासारखं करून पुढें चालूं लागला....

त्या मोटारींतल्या तरुणाची ती हातातोंडाची असली हालचाल चार पांच वेळां झाली. पण अजूनहि न पेटलेली सिगारेट त्याच्या तोंडांत तशीच पाहून, मग मात्र माझी खात्री झाली कीं, त्याला काड्याची पेटी पाहिजे होती. विकत घ्यायला खालीं उतरेन म्हणेल तर, मग पुढली मोटर हलेल व मग मागला ड्रायव्हर हॉर्न बोंबलवूं लागेल. गप बसावं तर सिगारेट पेटवतां येत नव्हती ! अशा मोठ्या प्रसंगांत सांपडला होतात तो !

समोरच पण जरा लांब अंतरावर असलेल्या इराण्याच्या गजबजलेल्या हॉटेलकडे एकदां निराश दृष्टी फिरवून, बिचारा मागील गादीवर टेकून स्वस्थ बसला !—तितक्यांतच त्यानें आपल्या बायकोकडे वळून पाहिलंन्; दोघांचीहि दृष्टिभेट होतांच



त्यांनीं मंद स्मित केलं !—आणि तीं पुन्हां गप्प बसलीं—पण त्या त्यांच्या स्मितयुक्त मौनांत विरस होता.

माझ्याकडे त्यांचं लक्ष नव्हतं. पण मी मात्र त्यांच्या त्या गुपचुप चाललेल्या हालचालींकडे, एका बाजूस निमूट उभा राहून पहात होतों—

प्रथम मला वाटलं, 'बरा खोड्यांत सांपडला आहे, बेटा !—स्वार्थासाठीं वेळेवर अशा हव्यातेवढ्या गयावया करतील लेकाचे !—पण एऱ्हवी चढेल बेटे. बरं,... आतां नाही क्षणभर त्याला काडी नाही मिळाली, तर जगाला काय आग लागणार आहे थोडीच !—आणि जीव नाहीं कांही जाणार आहे त्याचा ! त्यांच्या क्षणिक चैनीची त्यांना मात्र किंमत अं ऽ ?...आणि ज्यांच्या जीवावर हे जगतात, ते आमचे हजारों दुर्दैवी देशी लोक अन्नाशिवाय—'

—पण मग मीच माझ्या या विचारमालिकेला उपहासानें हसलों ! मला पुन्हां वाटलं, 'माझा हा उगीचच,...कठोर, निराश, एकांगी त्रागा आहे !...यावेळीं केवळ एक धूम्रपी म्हणून तरी त्याला पाहिजे असलेली काडी कोणीतरी पुढें करावी ही साधीसुधी सौजन्याची,... माणुसकीची अपेक्षा आहे त्याची !— तिलाहि तो माझ्याकडून पारखा व्हावा कां ?—'

—केवळ असल्याच विचारामुळें, शेवटीं माझा हात पटकन् माझ्या खिशांत गेला !—

माझ्या पेटींत दोनतीनच काड्या होत्या. मी त्याला पेटी पुढें करण्यासाठीं त्याच्या बाजूस चालूं लागतांच एक क्षणच मला पुन्हां वाटलं, "माझ्या दोन तीन काड्यांपैकीं मी त्याला एक देणार. हा आपली चैन पुढें चालूं करणार. आणि फार तर त्याच्या इंग्रजी रितीप्रमाणें तो मला म्हणणार—'थँक यू!' याहून जास्त, माझ्याविषयीं अगर माझ्या या क्षणींच्या इतक्यां विविध भावनांविषयीं याला काय वाटणार आहे दुसरं?"

तरी पण मी पुढें झालों;...आणि माझी काड्याची पेटी मी अगदीं सहजपणें (पण त्याला अनपेक्षित) त्याच्यापुढें केली!

किंचित चमकूनच त्यानें माझ्याकडे पाहिलं!—आणि मग वस्तुस्थिती एकदम जाणून, मोठ्या आनंदानें त्यानें तोंडभर स्मित केलं! नंतर शेजारच्या आपल्या बायकोकडे स्मितयुक्त चेहऱ्यानें मान वळवून, त्यानें इतका वेळ तोंडांत नुसती धरून ठेंवलेली आपली सिगारेट मोठ्या दिमाखानें पेटविली!....

त्यानें एक धुराचा भपकारा सोडल्यावर तीं दोघेंहि माझ्याकडे आनंदी, संतुष्ट व हसऱ्या अशा आपल्या मोहक चेहऱ्यांनीं पाहूं लागलीं!....

सारें अगदीं मुकाट्यानें चाललं होतं!...मीहि कांहीं बोललें नाहीं!

पण काडीची त्याची गरज झाल्यावरहि, पेटी परत येत नाहींसं पाहून, मला चटकन् संशय आला, 'पाहिलं!...माझी मघांची कल्पनाच खरी ठरली!...दोन काड्याच कां होईनात, त्या असऱ्या परिस्थितींत हातीं आल्यावर तो त्या मारणारच—"

पण त्या काड्या त्यानें तशा नेल्या असत्या, तरी माझं कुठें सर्वस्व चोरून नेणार होता तो!—तो दुखावलेल्या भावनांचा प्रश्न होता एवढंच!—तेव्हां मनाची एकदम समजूत करीत मी आपला निमूटपणें परतूं लागलें!—

—इतक्यांत, त्यांच्यांत कसलीशी दबल्या आवाजांत कुजबुज झालेली मला ऐकूं आली!—त्या दोघांचेहि चेहरे क्षणभरच गोंधळले! तीं भांबावलेलीं दिसलीं!—

पण मग दुसऱ्याच क्षणीं, त्या तरुणीनें, आपल्या नवऱ्याला, आपल्या उघड्या हाताच्या कोंपरानें हळूच सूचक स्पर्श केला;...माझ्याकडे व त्याच्याकडे पहात, पटकन् आपल्या हातांतील सुंदर पर्स उघडून, तींतून एक सुबक अशी नक्षीदार सोन्याची पेटी तिनें बाहेर काढली!—व ती त्याच्याकडे पुढें करीत, मला उद्देशून, हंसत हंसत पण भरकन् ती म्हणाली, "Say—Please wait!—"

त्या त्यांच्या अनपेक्षित मुग्ध हालचालींचं मलाहि आश्चर्य वाटलं! मी परत फिरतांफिरतां जागच्याजागीं थबकलें!

आणि माझं आश्चर्य ओसरलं नाहीं, तोंच, त्यानें ती सोनेरी पेटी पटकन् उघडली;...तींवर माझी एका काडीची पेटी ठेवली व तें सारंच माझ्या हातीं देत, तो हास्य मुद्रेनें मला म्हणाला, "Will you smoke?—Please do!"

मीहि किंचित् भांबावून, त्याच्या शेजारच्या त्या तरुणीकडे

पाहिलें. ती अगदीं हंसतमुखानें माझ्याकडे पहात होती. आणि तिच्या नवऱ्यानें केलेल्या विनंतीस मी मान द्यावा अशा अर्थाचा आग्रहीभाव तिच्या नजरेंत भरलेला मला दिसत होता !—

मी माझ्या हातीं उघड्या असलेल्या त्याच्या त्या सोन्याच्या डबींत पाहिलें—तींत एकच सिगारेट होती !—

क्षणभरच मी घुटमळलें—पण मग ती बाहेर काढली; त्यांच्या देखतच तेथें उभा राहून मी ती शिलगावली व रिकामी डबी पुन्हां त्याच्या हातीं दिली !—

तीं दोघेंहि आनंदून म्हणालीं, “ Thanks many ! ”

—तोंच, बराच वेळ थांबलेल्या त्या मोटारमालिकेंतील पुढली मोटर हलली; त्यानेंहि लागलीच आपली सुरूं केली; . . . गियरचा आवाज झाला !—

सिगारेट धरलेला हात वर करून मी त्यांच्याकडे हास्य-मुद्रेनें पहात बाजूस झालें. त्या दोघांनींहि जातांजातां मागें वळून माझ्याकडे पहात मंद स्मित केलं !—

एकदाच दोन पावलें पुढें चालतां चलतां, मी हातांतील त्या अनपेक्षित मिळालेल्या सिगारेटचा झुरका घेतला. जव-ळच्या दिव्याच्या उजेडांत माझ्या चिमटीजवळच्या टोंकाकडे पाहिलें— ‘555’ ! अतिशय आनंद वाटला होता मला त्यावेळीं !—

मनांत विचार येत होता, “ लेकाच्यांना चैनीची चटक,... स्वार्थ आहे;—पण त्यांच्याकडे सहानुभूति देखील आहे; . . .



त्यागहि आहे !—नवऱ्याबद्दलचा आपल्या मनांतील हा भाव दाख-विण्यासाठीं ती तरुणी क्षणभरच किती घुटमळली ?—किती चट-कन् तिनें त्याला पुढलं सारं सुचविलं. किती झटकन् त्यानें तें ग्रहण केलं !—आणि आपली डबी व तींत असलेली एकुलती एक ‘555’ शेवटीं किती अदबीनें व आस्थेनें माझ्यापुढें केली !—”

हा प्रसंग कदाचित् अगदीं किरकोळ, साधा वाटेल तुम्हाला !—पण मला तर तो फार फार महत्वाचा वाटतो,.... चिरस्मरणीय वाटतो,...त्या तरुण जोडप्याविषयीं अगदीं कौतुक वाटतें; आणि मी अनेकदां मनाशीं म्हणतें, “ हीं माणसांचीं मनें बरं !—क्षुद्र गोष्टींतहि अशीं प्रतीत होतात !

या वस्तुस्थितीनें रंगलेली ती त्यांच्या पेटींतील एकुलती एक शेवटची सिगारेट होती—म्हणूनच यावेळीं धूर व राख होऊन नाहीशी झालेली ती ‘555’ सिगारेट अजून मला आठवते....

नाहीतर त्यानंतर अनेकवेळां, मी त्याहूनही भारी सिगा-रेट्स्, कधीं कधीं गमतीखातर ओढल्या आहेत;...पण त्या कधीं व कोणत्या ब्रॅन्डच्या याची मला जरासुद्धां स्मृति नाहीं !—

धूम्र—रक्षा—रुपानें कोठल्याकोठें विलीन झालेल्या त्याच विशिष्ट सिगारेटची अशी आठवण रहाण्याचं कारण, तिनें आपल्या भोंवतीं त्या दिवशीं जळतां जळतां निर्माण केलेलं वातावरण !—तिच्या धुराच्या लोटांबरोबर त्या माझ्याभोंवती गजबजलेल्या

माणसांचा कल्लोळ !—व तसाच माझ्या मनांत त्यावेळीं अनेकविध विचार घालीत असलेला अपूर्व घोळ !

ती सिगारेट माझ्या एका काडीची रोकड किंमत नव्हती ! त्या जोडप्यानें माझ्या अकारण सौजन्याची त्याच नाण्यांत व अगदीं वेळेवरच केलेली ती त्यागी परतफेड होती !—



# २ स = माणुसकी

माझ्या सौजन्याची सौजन्यानें केलेली किंमत म्हणजेच ती '555' !...ती मी अगदीं आनंदानें ओढत होतों. भोंवती बादशहाच्या ज्युबिलीची दिवाळी झगझगत होती !...गर्दी मीं म्हणत होती; मी माझ्या तंद्रींतच गर्क होतों.

मला तो धूर सोडत असतांना अचानक तत्वज्ञान सुचत होतें...( आतांहि मला तसंच वाटतं! ) समाजांत वावरणाऱ्या मानवी व्यक्तींचेंहि असंच आहे नाही कां ?—सारींच धूर व रक्षा होऊन पंचमहाभूतांत विलीन होत असलीं, तरी अनेकांतून क्वचित कांहींचीच स्मृति या संस्मरणीय सिगारेटसारखी अनेक वेळां अनंत काळपर्यंत ताजी रहाते!...कारण माझ्यामतें अगदीं उघड आहे; तें म्हणजे त्या व्यक्तींच्या आयुष्यांत वेळोवेळीं निर्माण झालेलं त्यांनी आपल्या कर्तृत्वशाली व्यक्तित्वाच्या जोरावर तयार केलेलं, असलंच अभिनव जोरदार, असामान्य वातावरण !...आपलं शरिर झिजत असतां, ते विलीन

होण्यापूर्वीं त्यांनी जागरुकपणें केलेलं समाजोपयोगी कार्य !—

अशाप्रकारचे अनेक विचार करीत, त्या जनसंमर्दांत, मी ती संस्मरणीय वाटणारी सिगारेट प्रत्यक्ष जळत असतांना तिजकडे व तिच्यांतून निघणाऱ्या धुराच्या वलयांकडे पहात, एक प्रकारें धुंद होऊन उभा होतों !...तोंच,....

त्यावेळची एक गमतीची आठवण पहा !—मी माझी विचार-वलयें त्या धूम्रवलयांत विलीन करीत होतों, तेवढ्यांतच एक वृद्ध गृहस्थ माझ्यापुढून गेला !....तो आमच्या घरांतील साऱ्यांच्या दाट परिचयाचा व माझ्या माहितींतील होता !....

आतां,...त्याचवेळीं माझ्या भोंवतालच्या गर्दींत, माझ्या पलीकडे, मजा पहावयास जमलेले चार पांच बाले, 'कसा हांव?.. बरां हाव !' करीत विड्या फुंकीत उभे होते. दुसऱ्या बाजूस दुसरे कांहीं पांढरपेशे सिगारेट ओढीत बोलत चालले होते....

पण त्या माझ्या थोड्याफार परिचयाच्या गृहस्थानें, माझ्या समोरून जातांनाच फक्त, (आपल्या वृद्धत्वाच्या अहंगंडाची कल्पना मनांत वागवून)—अशा कांही चमत्कारिक तिरस्कार-पूर्ण नजरेनें माझ्याकडे टवकारून पाहिलं, कीं मला त्याच्या त्या वृत्तीचा तिटकाराच आला !

त्यामुळें मात्र मी चिडलों आणि अगदीं निर्विकार नजरेनें त्याच्या चेहऱ्याकडे तितक्याच भेदक नजरेनें पहात, तोंडांतील धुराचा एक भला मोठा भपकारा मी त्याच्या बाजूस सोडला व कांहीं झालंच नाहीं, अशा नजरेनें मी दुसरीकडे पाहूं लागलों !—



यावरून तुम्ही गैरसमज मात्र करून घेऊं नका माझ्या-विषयीं !—मला ज्ञानवृद्ध—आणि वयोवृद्धहि—माणसांचे आदर अनादर पूर्णपणें समजतात ! मतभेद असला तरी कोणत्याहि आपल्याहून वडील माणसाला (त्यानें जगांत घालविलेल्या चार अधिक पावसाळ्यांसाठीं) आदर देण्याची माझी अगदीं नेहमी तयारी असते ; ...आमच्या घरांतील उतार वयाच्या गड्याला किंवा क्लबांतील म्हाताऱ्या स्वयंपाक्यालाहि, बहुमानार्थी 'अहो' म्हणण्याची अनेक वेळां मला मनापासून इच्छा होते !—पण मग—

कल्पना करा !—त्याच घोळक्यांत, मी तसा धूराचा लोळ सोडीत उभा असतांना, त्या गृहस्थाऐवजीं, चुकून माझे वडील अगर ज्यांच्याविषयीं माझ्या मनांत अनेक कारणांमुळें विशेष आदर कायमचा वसत आहे अशा इतर एकदोन व्यक्तींपैकीं एक गेली असती, तर !—तर काय ? क्षणमात्रही विचार न करतां तीच आज मला संस्मरणीय व महत्वाची वाटणारी सिगारेटहि सबंध ओढून संपविण्यापूर्वींच, पटकन् दूर फेकून दिली असती !-व मग भांबावल्यामुळें तोंड घाईघाईनें पुसून, त्यांच्या स्वागतास पुढें झालों असतों !—

पण त्याला अर्थात् अनेक कारणें आहेत !—मला माझ्या वडिलांविषयीं वाटणारा आकृत्रिम आदर, ... मतभेद अनेकदां होऊनहि त्यांनी आम्हांला आजपर्यंत आमच्या आचारा-विचारांनां दिलेलें लहानमोठें स्वातंत्र्य, ... त्यांना स्वतःला कसलंच व्यसन नाहीं ही वस्तुस्थिति ! ... शिवाय त्यांच्या

एकंदर श्रेष्ठ चारित्र्याचा प्रभाव म्हणून कांहीं तरी आहेच कीं नाहीं ?—

आणि त्याहून महत्वाची गोष्ट-ह्मणजे सहिष्णुतेनें व सहानुभूतीनेंच साधारणतः वागण्याची माझ्या वडिलांची मोकळी वृति ! नेहरु पितापुत्रांसारखें खास नाहीं आमचं !-आह्मी दोघेहि कांहीं तसे मोठे नव्हत !-आतां-मी सिगारेट ओढलेली त्यांना कदाचित्-(कां ?-नक्कीच !)-मनामध्यें तरी आवडणार नाहीं !—

पण इतकं असूनहि, त्यांनीं जर मला तसं रस्त्यांत पाहिलं असतं, तर ते माझ्यावर रागावण्यापेक्षां, मला उपदेशाचे शब्द सुनावण्यापेक्षां, आपणच आपली मान बाजूस फिरवून, (व पाहिलं न पाहिलंसं करून) पुढें चालूं लागले असते !—

आणि त्यांनीं आपली सहिष्णुता सहानुभूति दाखविण्याचं तसं कर्तव्य केलं असतं, म्हणूनच मींहि माझं कर्तव्य करण्यास, पटकन् माझ्या हातांतील सिगारेट, ती कितीहि मूल्यवान असती तरी दूर फेंकून किंचित् भांबावून पुढें झालों असतों.

पण या मी म्हणत आहे त्या गृहस्थाचं तसं कांहींच नव्हतं !—त्याचं खाजगी व बाहेरील चारित्र्य मला पूर्ण ठाऊक होतं !—त्याची दांभिक नीति, त्याची इतर सारीं लहानमोठीं व्यसनें, सारं कांहीं मला नक्की अवगत होतं !—तरी इतकें असूनहि त्यानें मंदस्मित करून, माझ्याकडे स्नेहपूर्वक पाहिलं असतं, तर निदान त्याच्या वयाकडे व आमच्या घरोब्याकडे पाहून तरी मला कांहीं वाटलं असतं ! आणि ती सिगारेट फेंकून



देण्याइतकं नसलं तर ती थोड्या घाईनें क्षणभर मागें लपवून मानेनेंच त्यांना नमस्कार करण्याइतकें तरी माझ्यांत सौजन्य खासच होतं !—

पण ज्या रागीट व हक्काच्या अपेक्षापूर्ण दृष्टीनें त्यावेळीं चालतां चालतां तो माझ्याकडे पहात होता—तिच्याच खालची त्याची नाकाची बोंडी तपकिरी झालेली मला दिसत होती. आणि आपल्या चिमटींतील तपकीर, चमत्कारिक आवाज करीत, तो आपल्या नाकांत कोंबीत होता. त्या त्याच्या तपकिरी नाकाखालच्याच त्याच्या उग्र सुजलेल्या तोबऱ्यांत पंचमासह तांबूल मर्दिला जात होता.

त्यावेळीं, मात्र सिगारेट, तपकीर या दोन्हीहि आपल्या तोंडांत त्याक्षणीं असलेल्या तंबाखू या एकाच पदार्थापासून तयार होतात आणि तीं सारीं भावंडें आहेत !—हा विचार त्याच्या ध्यानीं मनींहि नव्हता !—आणि वृद्धत्वाचा मोठेपणा तरी कशाला पाहिजे होता त्याला ! आम्हांला त्यानें लंगोटी नेसलेलं पाहिलं असेल हीच त्याची फुशारकी !—

म्हणूनच मला त्याचा साहजिक राग आला !—तें चुकीचं होतं असं मला आतां विचार करूनहि वाटत नाहीं !—कधींच व कशाचाच राग न येणें याला कांहीं मी तरी माणुसकीचं लक्षण खास म्हणणार नाहीं !—

—आणि मला जगांत खरं आवडत नाहीं तें हेंच !—

आपण लोकांकडून पुष्कळ अपेक्षितों !—आपण लोकांना

मात्र कांहींच देत नाहीं !–त्यांचं कांहींहि सहन करीत नाहीं !–लोकांच्या लहानसान दोषांकडे आपण कुत्सित नजरेनेंच सूक्ष्मदर्शक यंत्र लावून पहातों;...पण आपलं मुसळहि आपल्या डोळ्यांतून सुटतं !

हें माणसाचें मन म्हणतां येईल कां?—नाहीं !–मानवी समाजांची आदर्श नीति,–ही माणुसकी—अगदीं निराळीच आहे !—

माणुसकींत आपण आणखी अनेक गोष्टींचा समावेश करूं ! पण कमींत कमी व अत्यावश्यक गोष्टी दोनच !–दुसऱ्यांच्या लहानमोठ्या सुखदु:खाशीं समरस करावयास लावणारी सहानुभूति; व आपल्याप्रमाणेंच इतरांना अगदीं प्रांजल मतें असतात, त्यांनाहि विचार करतां येतो, त्यांच्या हातूनहि क्षुद्र अगर ढोबळ चुका होतात या जाणीवेला डोळस करणारी सहिष्णुता !—

आजपर्यंच्या आयुष्यांत गणितानें अनेकदां दगा दिला, तरी येथें एक ओबडधोबड समीकरण मांडण्याचा मोह अनावर होतो—'२ स = माणुसकी.'

आणि असली माणुसकी नेहमीं आढळत नाहीं म्हणूनच जगांतील बहुतेक दु:खें निर्माण होतात !—



# रेडियो

गडबडघाईच्या शहरी व्यवहारांत सुटीचा दिवस–म्हणजे स्वर्गसुख असतं !–'हुऽश्श' करून रेडिओचें बटन दाबावं; आरामखुर्चीवर ऐसपैस पाय पसरावेत; त्या दिवसाच्या तारखेप्रमाणें व आपल्या एकंदर ऐपतीप्रमाणें कमीजास्ती किंमतीचा धूर सोडावा; स्वस्थ पडून रहावं किंवा आपल्या आवडीचं पुस्तक वाचत बसावं.

असला मोह शहरच्या कोणत्या माणसाला होत नाहीं?—

मात्र त्यावेळीं कर्णमधुर सूर कानावर पडावेत हीहि एक मोठ्यांत मोठी आशा मनाला असते. केवळ वातावरण –पालटासाठीं खऱ्याखुऱ्या एखाद्या खेडवळ 'सोनगांवीं' जावंसं फार वाटतं. आणखीहि पुष्कळ पुष्कळ वाटतं....

त्या दिवशीं, मी माझ्या छोट्या घरकुलाच्या राज्यांत असलंच मोठं स्वर्गसुख अनुभवीत एकटा बसलों होतों. कालातीत वागण्याचा तो एकटाच दिवस असल्यामुळें माझं घड्याळ्याकडेहि

लक्ष नव्हतं. माझे बेफिकीर डोळे हातांतील उलट्या पुस्तकाकडे होते, व कान रेडिओच्या बटन दाबल्यानंतरच्या सुरवातीच्या हुंकाराकडे होते.

पण माझी निराशा झाली. हुंकारांतून नेहमींचा भूमीजनांना हांका मारणारा कंटाळवाणा ध्वनि एकदम प्रकट झाला— "हं, राम राम मंडळी!..."

नेहमींच्या अनुभवामुळें माझ्या कपाळाला आंठ्या पडल्या.

मी तोंड फिरवतों, तों माझ्या सताड उघड्या असलेल्या दारांत एक परिचित काटकोळी व्यक्ति दिसली, व कानावर त्यांनीं मोठ्यानें उच्चारलेले शब्द आदळले—" हं, राम राम मंडळी!—"

० ० ०

जितक्या कंटाळवाण्या चेहऱ्यानें पहिल्या हांकेसरशी मी तोंड बाजूस फिरवलं होतं, तितक्याच आनंदी, उत्साही, हंसतमुखानें दारांत उभ्या असलेल्या समोरील व्यक्तीकडे मी आस्थेनें चालत गेलों.

माझे बऱ्याच वर्षांचे स्नेही गजाभाऊ हंसतमुखानें मजकडे पहात उभे होते. स्वारीच्या अव्याहत बोलण्यामुळें, रेडिओ नव्हता त्या काळापासून आम्ही त्यांना 'ग्रामोफोन' म्हणत आलों होतों. आणि आज रेडिओप्रमाणें 'राम राम मंडळी!' म्हणतच ते किती दिवसांनीं माझ्या घरीं प्रकट होत होते. क्षणभर वाटलं,... "यांचं जुनं नांव आतां टाकूं या. काळ बदलतो त्याप्रमाणें



नांवहि बदलूं या. आणि यांना आतां 'रेडिओ'च म्हणूं या."

असले तरल विचार माझ्या मनांतून सरकन् सरकून जात आहेत, तोंच गजाभाऊंची स्वारी आंत सरकली व मी उठल्यामुळें रिकाम्या झालेल्या आरामखुर्चीवर, मी सांगण्यापूर्वींच पसरली!

मला त्यांच्या या अनौपचारिक, सरळ, मोकळ्या वृत्तीनें मनापासून आनंद वाटला. अर्थात् तें कांहीं मला नवीन नव्हतं. त्यांना आम्ही 'ग्रामोफोन' म्हणत असूं, तरी त्यांची बडबड रस्त्यावरील हॉटेलाहॉटेलांतून होणाऱ्या किरकिरीसारखी आह्मांला खासच वाटत नसे! किल्ली दिली की ते बोलत, पुष्कळ वेळ बोलत आणि कोठेंहि बोलत, एवढंच त्यांच्यांत व ग्रामोफोनमध्यें साम्य होतें!—

पण त्यांची ही किल्ली मात्र यांत्रिक नव्हती. ती विचारांची असे. आणि ते नुसतेच बोलत नसत; विचार बोलत असत, विचार आचरणांत आणीत असत. निदान गेलीं पंधरा वर्षे मीं त्यांना पाहत आलों होतों.—

कॉलेजपर्यंतचं शिक्षण, जी. आय. पी. त नोकरी, संसार, अगदीं दोन दोन वर्षांच्या अंतराचीं मुलें!—पण गजाभाऊंचे विचार खोड्यांत पडलेले नव्हते. आचरण सांचलेल्या डबक्याप्रमाणें झालेलं नव्हतं. त्यांत प्रवाह होता; धबधबे होते. कड्याच्या तोंडाशी येऊन त्यांनीं खोल दरींत उडीहि घेतली होती!

नाहींतर पहिल्या सात आठ वर्षांत सवाशेंपर्यंत चढलेली

ही स्वारी, रेल्वे कामगार संपाच्यावेळीं, बडतर्फ केलेल्या माणसांच्या यादींत पडली नसती. त्यांचा पूर्वींचा फेटा, लांब धोतर, सहा बटणांचा डगला जाऊन, त्यांऐवजीं रंगीत खादी टोपी, शर्टवरचें तीन खिशांचं जाकीट व गुडघ्याखालपर्यंतचं जाडंभरडं धोतर, असा वेष आला नसता.

० ० ०

"काय रेडिओ चालला होता वाटतं ?" इझिचेअरवर पडल्या पडल्या आपल्या तीक्ष्ण डोळ्यांनीं माझ्याकडे पाहून ते म्हणाले व रेडिओकडे पाहूं लागले. त्यांतून आवाज येत होता–"आतां आमचे एक कलाकार तुह्मांला गाणं म्हणून दाखवीत होते. यानंतर सुंदराबाईंची लावणी ऐका–'तूं नकोऽऽकरूंऽ घाऽईऽऽ."

पुढलं गाणं माझ्या कांहीं कानावर पडलं नाहीं. 'खट्' असा गजाभाऊंनीं बटण दाबल्याचा आवाज मात्र झाला. आणि त्यांचा स्वतःचाच ग्रामोफोन–नव्हे रेडिओ–प्रस्तावना न करतां एकदम सुरूं झाला. "हं...! भूमीजनांचे कार्यक्रम...! हेच कां हो तुम्ही करतात ते भूमीजनांचे उद्धार ? आणि हेच दुबळे रेडिओ, तुम्हांला ज्ञान देणार, तुमची करमणूक करणार ? हं !...हल्लीं तुम्हां लोकांना आयतीं बटनें तेवढीं दाबतां येतात ! पण नव्या ठिणग्या कांहीं पाडतां येत नाहींत ! ! विजेनें माणसें मरतात म्हणतात तीं अशींच असतील कदाचित्.....!"

गजाभाऊ आल्यापासून माझी आधींच विचारामुळें क्षणभर वाचा गेल्यासारखी झाली होती; त्यामुळें मी त्यांच्या असल्या



तुटक येणाऱ्या वाक्यांनीं जास्तच मुखस्तंभ होऊन त्यांच्याकडे पाहूं लागलों.

ते इझिचेअरवरून उठून माझ्या टेबलावरील अस्ताव्यस्त पडलेलीं पुस्तकें वरखालीं करीत होते. एका दोस्ताकडून मला भेट म्हणून आलेलं, त्याचं नवीनच प्रसिद्ध झालेलं पुस्तक, त्यांनीं हातीं घेतलं व त्याचीं पानें ते चाळूं लागले.

शेवटीं उघडें पुस्तक हातांत धरून ते माझ्या बाजूस वळले व म्हणाले, "आतां रेडिओचं पाहिलंच आपण ! तुमचे लेखक तरी हल्लीं काय लिहितात रे ? त्यांना आम्हां साधारण माणसांना सांगायचं काय आहे ? कीं छापखान्याचे दर म्हणतात कमी झाले आहेत, म्हणून हें वाङ्मय जागोजाग उगवतं ?..." पोटासाठीं–पण तेंहि खरें वाटत नाहीं–अस्त्रें नाचवण्याची कसरत म्हणतात,.. तसला तर कांहीं प्रकार नसेल ना हा...?

आजची गजाभाऊंची तुटक वाक्यांची पद्धति मला जरा निराळीच वाटत होती. आल्यापासून त्याचं माझ्याकडून आगत–स्वागत झालं नसल्यामुळें व त्यांच्या त्या एकेरीच बोलण्याला जरा खंड पडावा म्हणूनहि, मी मध्येंच म्हणालों, "हें पहा गजाभाऊ, फार दिवसांनी आज भेटताहां; आणि आल्याबरोबरच अशीं हीं शब्दें कशाला पाजळताहां ? चहा घेणार ना आधीं ?—"

"'मी जन्मांत कधीं चहा घेतला नाहीं' असें सांगणाऱ्यांपैकीं नव्हे मी—" गजाभाऊ किंचित् हसून म्हणाले,

" आणि आतां तिन्ही सांजेच्या वेळेलाहि मुंबईत चहा विचारणं, ही तुझी पण चूक नव्हे. पण बायकांना त्रास देऊन असले हे दांभिक उपचार जग किती दिवस पाळणार आहे रे?—"

माझी गोळी माझ्यावरच उलटली होती! आतां गजाभाऊंना थोपवावं तरी कसं?... अशा विचारांत मी म्हणालों, " पण गजाभाऊ, हें तुम्हीं आज सूत्रात्मक काय चालविलं आहे?—"

गजाभाऊ मोठमोठ्यानें हंसले. त्यांनीं पुस्तक टेबलावर ठेवलं व टेबलावरच आसनमांडी ठोकीत ते म्हणाले, " अरे जग वायफळ वटवटच फार करतं! आम्हीं चार विचार अघळपघळपणें बोललों तर आम्हीं तुम्हांला बोलणारीं यंत्रें वाटतों; तेव्हां या सूत्रात्मक पद्धतीचीच आज जगाला जरूरी आहे, मला वाटतं! मात्र ती साधीं असावींत, अर्थपूर्ण असावींत... 'ऋलृक् एओङ् ऐओच् हयवरट्' अशीं नसावींत म्हणजे झालं!—"

० ० ०

बोलण्यांत अर्थ असावा, हें सांगण्यासाठीं बोलतां बोलतां गजाभाऊ अर्थहीन व्याकरण-सूत्रांत शिरले, याची मला मौज वाटली. आणि त्या दृष्टीनें मी त्यांच्यांकडे पहात आहे, तोंच ते एकदम उभे राहिले व आपल्या जाकिटाच्या खिशांतून त्यांनीं चार रुपये काढून माझ्यापुढें केले! आणि मग ते मला म्हणाले, "हं. हे घे. मला आतां गेलं पाहिजे.—"

मला तर त्याचा अर्थच समजेना; मी त्यांच्याकडे आश्चर्यानें टकमकां पाहूं लागलों!—



"अरे घे! हे तुझेच पैसे—" गजाभाऊ माझ्याकडे पाहून म्हणाले, "तिदस्तां आमचा धाकटा विनायक वगैरे आजारी होता, त्यावेळीं तूं आणून दिलेल्या औषधाच्या डब्याचे! बरेच दिवस देईन म्हणतों आहे, पण साडेएकत्रीस रुपयांत सारं भागत नाहीं, रे! बरं, जाऊं!—मला परवां आठाला एका मीटिंगला हजर रहावयाचं आहे. आणि युनिअनचंहि महत्त्वाचं काम आहे त्यानंतर—"

मी बोलण्यापूर्वींच, चार रुपये टेबलावर ठेवून, गजाभाऊ दारापर्यंत पोंचले होते. आणि मी कांहीं सांगण्यापूर्वींच,— " वहिनी बाहेर गेलेली दिसते! बरंऽ,.. येईन केव्हां तरी पुन्हां! बरं मंडळी!—चालू द्या तुमचा रेडिओ!"—असं म्हणत गजाभाऊ लगबगीनें लांब निघूनहि गेले—

गजाभाऊ अनपेक्षित आले तसेच पटकन् गेले. त्यांनीं माझ्या खोलींतील रेडिओ बंद केला खरा; पण त्यांच्या त्या वेळच्या तुटक वाक्यांनीं, उघड्या सरळ वर्तनानें, माझ्या मनांत मात्र नवाच दांडगा रेडिओ तयार झाला होता; आणि त्यांत त्यांच्याबरोबर घडलेले अनेक पूर्वप्रसंग व त्यावेळची त्यांची 'बड-बड'— त्यांतील अनेक वाक्येंच्या वाक्येंच जणुं—(कुठल्या तरी ध्वनीलाटांची होणारी आकाशवाणी कानावर आदळावी त्याप्रमाणे—) माझ्या कर्णपटलावर येऊन आदळत होती!

० ० ०

त्या माझ्या हातीं असलेल्या चार रुपयांचा इतिहास प्रथम

माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला. गजाभाऊंचीं तीन मुलें त्यावेळीं सारखीं आजारी होतीं. बायकोची प्रकृतीहि बिघडली होती, स्वतःच्या परिस्थितींत सामावून घेणारे, निर्व्यसनी, काटकसरी, असे गजाभाऊ,...तरी त्यावेळच्या अठ्ठावीस रुपयांत त्यांना ही घरांतील शुश्रूषा संभाळायची होती. वरळी चाळींतच संसार पसरून, त्यांनीं आपला नेहमींचा पसारा आटोक्यांत आणला होता. पण म्हणूनच आगंतुक पाहुण्यांप्रमाणेंच या आजारालाहि घरांत जागा द्यावयास त्यांना त्यावेळीं अवसर नव्हता.

मी एके दिवशीं गेलों तेव्हां गजाभाऊ या संसारी पसाऱ्यांत बसले होते. तेथील भयंकर परिस्थिती पाहून मी माझा एक डॉक्टर स्नेही तेथें गुपचूप नेला. त्याच्या उपचारानें त्यांचीं दोन मुलें मरतांमरतां उठलीं. तिसऱ्या दगावलेल्या छोट्या मुलीचं दुःख बाजूस सारून, तें कांहीं दिवसांनीं मजकडे येऊन भांडखोरपणें पंधरा रुपये ठेवून गेले. डॉक्टरनें आपलं बिल पोंचलं, असं सांगितल्यामुळेंच, त्यांनीं मला हा दम दिला होता; आणि त्यावेळीं ते म्हणाले होते, "अरे, हे प्राणी येतात, आपलीं कर्जें फेडून घेतात आणि माणसांना मात्र मोठ्या मनाची करून जातात ! त्यांत त्यांचा दोष नाहीं,...तितकाच आमचाहि नाहीं. तुम्ही आतांचीं शहाणी माणसें 'संयमन' शिकवाल !...पण बाकीचं कृत्रीम जीवन काय कमी झालं आहे तर आम्ही असं जगायचं पुन्हां श्रीमंतीं सुखें तीं बाबा... आमच्या निर्धनाच्या निरुपयोगाचींच!"

० ० ०



त्यानंतर फ्लॅजेस्टिनचे वगैरे चार रुपये राहिले होते ते आठवणीनें परत करावयास ते आज इतक्या दिवसांनीं माझ्या घरीं आले होते.

मध्यें दोनदां ते भेटले होते. कधीं बरं ?

एकदां दिल्लीला रेल्वेंत, नव्यानें वर्षाची मोसमी नोकरी करण्यास जाण्याची ते तयारी करीत असतांना !—

त्यावेळीं ते मला रस्त्यांत भेटले असतां म्हणाले होते, "अरे, नोकरी कोण जन्मतःच घेऊन येतो आहे थोडीच, वेड्या ?... माझ्या बरोबरचे आतां एकशेपंचायशीपर्यंत गेले आहेत. हं, घाबरूं नको...कारकुनीपद्धतीचं बोलणं नाहीं हें !...वस्तुस्थिति सांगितली आपली तुला. संप झुकला, ...नोकरी गेली !...मध्यें एक वर्ष बेकारींतहि काढलं होतं, फेरीच्या धंद्यांत रोज सहासात आणे मिळवून !—हमाली केली असती मी; पण शरिरांत ताकद नाहीं रे !...मग मजूरांनींच शेवटीं पोट दिलं मला ! तीस रुपयांत भागवायचं !...आतां पूर्वीचा हक्क जाऊन नवीन अर्जांत माझं नांव पडलं होतं,...त्याचा नंबर लागला आहे !—पण पडलेले सैनिक आम्ही—म्हणतात, 'पाहिजे तर दिल्लीला या; पंचेचाळीसाने सुरवात होईल. वर्षानंतर कदाचित तुमच्या खर्चानेंच परत जावं लागेल. जातों !...तेवढेंच चार लोकांचं ओघानें झालेलं कर्ज फिटेल !...आल्यावर पुन्हा मजूर, नाहींतर आपली बेकारी..."

० ० ०

आणि त्याचप्रमाणें ते वर्षानें दिल्लीहून परतले होते.

त्यावेळीं कोठें बरं भेटले होते ते मला ?...हो ...रस्त्यांत !.. गिरगांव नाक्यावर ट्रामची वाट पहात उभा होतों मी ....

मला पाहिजे होती ती 'सहा नंबर' शेवटीं आली. पण त्यांतून गजाभाऊंची स्वारीच खालीं उतरली.

आणि रस्त्यांत आम्ही त्यानंतर बोलत होतों.

मला वाटतं, एक, दोन, तीन...सतरा अठरा ट्रॅम माझ्या पुढून सरकल्या; पण गजाभाऊंचा 'ग्रामोफोन' रस्त्यांत सुरूं झाला होता; आणि त्या दिवशीं तर त्यांतून पुष्कळच सुरेल स्वर निघाले होते!—"ठरल्याप्रमाणें नोकरी सुटून दिल्लीहून आलों. पूर्वीच्या युनियनच्या कामांतच पडलों आहे आतां. आणि काम जोरांत चाललं आहे... अरे, जग जोरांत पुढें चाललं आहे, यांत संशय नाहीं! विचारसंक्रमणें होत आहेत; शोध होत आहेत; शास्त्रीय जीवन वाढत आहे. आणि याचा नाहीं म्हटलं तरी मनुष्यावर अप्रत्यक्ष परिणाम होतच आहे!...उत्क्रांति खात्रीनें होत चालली आहे!—तेव्हां आतां शेवटचा छोटा पल्ला गांठावयास केव्हांतरी क्रांतिसुद्धां खास होणारच!...पहा, इतक्या लाटा उठत आहेत!...त्या कांहीं फुकट जाणार नाहींत खात्रीनें...मनुष्याची आकलनशक्ति वाढली आहे. संस्कार-क्षमतेची वाढ ही काय लहानसान गोष्ट आहे, वेड्या ?... आम्हीं पस्तीशीच्या सुमाराला प्रयासानें शिकलों, ते आमचीं चार वर्षांचीं मुलें पूर्ण नैसर्गिक म्हणून धरून चालतात. अगदीं



जगाच्या सुरवातीपासून त्या गोष्टी चालू आहेत असं गृहीत धरूनच तीं पुढें चालूं लागतात......"

० ० ०

जवळ जवळ विसावी ट्रॅम गेली, हें पाहून मी अस्वस्थ झालों होतों.

पण गजाभाऊंच्या जिव्हाळ्याच्या एक एक वाक्यावरूनहि माझा कान हलेना.—तोंच ते पुढें म्हणाले, "मनुष्याचा जीवन-हेतु, त्याचं जगांतील समतेचं स्थान, औद्योगिक वाढीची दृष्टि, नव्या अशा, नव्या महत्त्वाकांक्षा, ...यांच्या लाटांचे पडसाद अगदीं बालकांच्या मनावरहि झालेले आहेत... आज दुपारचंच गमतीचं उदाहरण सांगतों तुला—दिल्लीच्या हवेनें आतां माझे दोघे छोटे छोकरे पुन्हां चांगले झाले आहेत. आज दुपारीं मी कांहीं युनियनचा पत्रव्यवहार करीत घरीं बसलों होतों. तों दोघांचं भांडण ऐकलं! —"

आणखी एक ट्रॅम निघून गेली; तरी गजाभाऊ पुढें सांगतच होते—"माझा गरम तांबडा रुमाल विनूनें हातांत घेतला होता आणि धाकट्यानें कॉंग्रेसचें निशाण असलेली माझी बाजारी पिशवी हात वर करून धरली होती. दोघेहि समोरासमोर 'लेफ्ट राइट' करीत आले आणि दोघेहि एकदम म्हणाले, 'इन्किलाऽब झिंदाऽऽबाद!'

"पण मग धाकटा म्हणाला, 'थोडे दिनमें गांधी राज!'—

"त्यावर मोठा गरम रुमाल वर करून हालवत म्हणतो—

'नाय् नाय्...थोडे दिनमें मजदूर राज!–' तेव्हां धाकटा रागानें म्हणाला—'नाय् नाय्...थोडें दिनमें गांधी राज!...' क्षणभरच विन्यानें त्याच्याकडे टवकारून पाहिलें व नंतर तो रागानें म्हणाला, 'अरे जारे!–मरो तुझा गांधी!–थोडे दिनमें मजदूर राज!' '—अरे अरे!...काय भांडता हां!–' असं मी ह्मणालों खरं;...पण मग मला त्यांच्या त्या साऱ्या बालिश संभाषणाची व विशेषतः आवेशाची गंमत वाटत होती!"

तेवढ्यांत आणखी दोन ट्राम गेल्या होत्या. पण गजाभाऊंचा आवेश पुढें चाढूंच होता—"आतां सांग?–या पोरट्यांच्या मनांत हे विचार कोणी रुजवले रे? आह्मी!–आमच्या लहानपणीं तर आह्मांला टिळक–आगरकर तरी माहीत होते कां?...आम्ही बरोबरीच्या मैत्रिणींत बुडकुल्यांनीं भांतुकली खेळत होतों!...तें कांहीं नाहीं बाबा!...खूप खूप आशा आहे आतां आह्मांला!... अरे, पोरांपासून-थोरांपर्यंत साऱ्यांचीं मनें आतां रेडियो झालीं आहेत, रेडियो!–वाटेल त्या लहानमोठ्या लाटा त्यांत प्रतिध्वनी उठवतात. ...त्यांना तुमची कृत्रीम एरियल आणि अर्थ लागत नाहींत!...हेच हेच ते नैसर्गिक रेडियो, बरं!...रस्त्यांत...घरांत सगळिकडे हे पसरलेले आहेत. घरोघर संदेश पोचतात ते असेच!... आतां यापुढला पल्ला ह्मणजे असल्या नुसत्या संस्कारक्षम 'रिसीव्हींग' स्टेशनांची वाढती संख्या नव्हे!... प्रत्यक्ष सामर्थ्यशाली लाटा सोडणारीं 'ब्रॉडकास्टींग' स्टेशनेंच वाढलीं पाहिजे!...हेंच तर पुढाऱ्यांचं, तुमच्या लेखणीबहादराचं



साऱ्यांचं, एकमेव काम!...मग शेवटीं असा काळ येईल, कीं लाटा सोडणं व ग्रहण करणं, हीं दोन्हीं कामें एकच मानवी मनाचं जिवंत यंत्र करील! ते मात्र अगदीं अद्भुत रेडियो होतील बरं!..."

० ० ०

गजाभाऊंच्या संगतींतील असले पूर्वीचे प्रसंग व विचार मी मनांत घोळत होतों, तोंपर्यंत ते माझ्या खोलींतून कितीतरी लांब निघूनहि गेले होते!... मी दचकून भानावर आलों. बाहेर गजबजाट होता तरी माझ्या घरीं शांतता होती! रेडिओचं बटन मघाशीं खालीं केलं होतं तें तसंच होतं!

जणूं गजाभाऊंनीं तें बटन खालीं करूनच माझ्या मनाचा रेडियो सुरू केला होता.

खोलींत काळोख पसरला होता, त्याचं मला आतांपर्यंत भानहि नव्हतं! मी उठलों व दिव्याचं बटन दाबलं!

अंधाऱ्या खोलींत प्रकाश पडला तेव्हांच मला गजाभाऊंचीं दोन वाक्यें पुन्हां आठवलीं! "तुह्मां लोकांना आयतीं बटणें दाबतां येतात. पण ठिणग्या कांहीं पाडतां येत नाहींत!"

मला अगदीं विजेचा धक्का बसल्यासारखं झालं!

## दिवाळीच्या वेळीं

रघुवीर सामंत कृत

# आ ज चीं  गा णीं

महाराष्ट्राचीं पहिलींच

## सांघिक–गीतें

" अक्षुण्ण विषय काव्यरचनेला निवडून त्यांतील सौंदर्य रसिकांच्या दृष्टीला आणून दिल्याबद्दल श्री. सामंत यांचें जितकें कौतुक करावें तितकेंच त्या विषयांसंबंधीं वाचकांच्या मनांत प्रक्षोभक विचार निर्माण करण्याच्या त्यांच्या लेखणीच्या सामर्थ्याबद्दलहि त्यांचें अभिनंदन करायला हवें ! " —**विविध वृत्त**

" हा कवितासंग्रह एका दृष्टीनें अलौकिक आहे...' कल्पनाशक्तीच्या वारूवर विराजमान होऊन जमिनीपासून वर अंतरिक्षांत भराऱ्या मारणारा तो कवि !' अशी बहुतेक जण कवीची कल्पना करतात. श्री. सामंत हे या जातीचे कवी नव्हत. " —**ज्ञानप्रकाश**

" श्री. सामंत यांच्यांत भरपूर कल्पनाशक्ती आहे. पुरेशी प्रतिभा आहे. शब्दशैली देखील काव्याला साजेशी अशीच आहे, हृदयांत प्रतीतीच्या भावना उचंबळून येऊं शकतात, श्रमजीवी वर्गाशी मिळून मिसळून व तन्मयतेनें त्यांच्याकडे बघण्याची त्यांची तयारीहि दिसते. " —**धनुर्धारी**

**किंमत अवघी ९ आणे**

( ९ आण्याची पोस्टाची तिकिटें पाठवून घरपोंच मिळेल. )

व्यवस्थापक—**पारिजात प्रकाशन** : ७ मॅथ्यूरोड : चौपाटी मुं. ४



## वाद–विवेचन–माला

वर्षांत प्रसिद्ध होणाऱ्या दहा पुस्तकांची आगाऊ वर्गणी

रु. ४ ( पोस्टेजसह )

१ सोशॅलिझम किं. ८ आणे.  २ फॅसिझम किं. ८ आणे

**आजच वर्गणीदार व्हा !**

यशवंत गोपाळ जोशी, ६२३/१५ सदाशिव : पुणें २



गडबडघाई जगांत चाले; आळस डुलक्या देतो पण.

गंभीरपणें घड्याळ बोले...आला क्षण ! गेला क्षण !

त्या प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग

**श्री समर्थ वॉच कंपनी**

सरकारी तबेला गिरगांव मुं. ४ चीं समर्थ घड्याळें वापरून करा.



**सर्व प्रकारची औषधें**

कोठेंहि कमींतकमी दरांत वक्तशीर पुरविणारी

**माधव एजन्सी, मुंबई ४**



**Unite !— and be Strong !**

ANSWER

# ' The Students' Call '

The official monthly journal of
The All India Student's Federation

**READ & SUBSCRIBE TO**

This Precious Monthly Containing articles on
Student's Movements in India
Student's Movemonts Abroad
and other varied reading material

**THINK & ACT**

Annual sub. Rs. 1-8  Single copy As. 2.

FREE SPECIMEN COPY

OFFICE — 21 DALAL STREET
FORT BOMBAY 1.

वर्तमानकालीन सामाजिक पार्श्वभूमि ! स्वयंपूर्ण पण सूत्रबद्ध कादंबरी-माला ! महाराष्ट्रांतील पहिलाच महत्त्वाचा प्रयत्न !

रघुवीर सामंतकृत

# उपकारी माणसें

( तीन खंडांची सामाजिक कादंबरी )

दिवसेंदिवस नष्ट होणाऱ्या एकत्र कुटुंबाचाच घटक असलेल्या, एका ध्येयवादी भावनाशील महाराष्ट्रीय चित्रकार कलावंताचा पूर्वजीवन वृत्तांत !

त्याच्या ' प्रवासांतील सोबती ! '– त्याच्या आयुष्यांत आलेलें ' अभ्र–पटल ! '– त्याला त्यानंतर दिसलेली उपकारी माणसांची ' आकाश–गंगा ! '

अभिनव–पण ओळखीचें मनोरंजक विविध वातावरण !

यांत १९३५ सालपर्यंतच्या जवळजवळ ७५ वर्षांचा महाराष्ट्र–समाज–चित्रपट कलात्मक लेखणीनें रेखाटलेला पहावयास मिळेल. त्यांत त्या अनुषंगानें आलेला जुन्यानव्या पिढींतील अव्याहत झगडा, १९३० सालचें राजकीय संक्रमण व तरुण मनाची आंदोलनें मराठी वाचकास अभिनव वाटतील.

प्रसिद्ध — खंड **१ प्रवासांतील सोबती**
[ पृष्ठें २७० डेमी, रु. २। ]

खंड **२ अभ्र–पटल**
[ पृष्ठें २८० डेमी, रु. २। ]

अप्रसिद्ध — खंड **३ आकाश–गंगा**
[ पृष्ठें सुमारे ३०० डेमी, रु. २॥ ]

[ १९४० च्या सुरवातीस प्रसिद्ध ]

**— पारिजात प्रकाशन —** ७ मॅथ्यू रोड मुंबई ४



‘ शब्दचित्र ’ हा नवीन वाङ्मयप्रकार महाराष्ट्रांत प्रामुख्यानें रूढ करणारे ‘ **कुमार रघुवीर** ’ १९३० सालापासून महाराष्ट्राला सुपरिचितच आहेत. १९३२ सालीं ‘ **हृदय** ’ हा त्यांचा शब्दचित्रें व लघुकथा यांचा पहिलाच संग्रह प्रसिद्ध होऊन त्यांचें मराठी वाङ्मयांतील मानाचें स्थान स्थिर झालें. ‘**हृदयां**’तील अनेक शब्दचित्रें आतां शालेय पुस्तकांतूनहि मुलांच्या अभ्यासक्रमांत आलीं आहेत.

१९३४ सालीं ‘ **वाळूतील पाउलें** ’ हा त्यांचा कलात्मकता व विविधता यांनीं नटलेला दुसरा लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९३५ सालीं प्रकाशित झालेला रुपांतरात्मक गोष्टींचा ‘ **सुरंगांची वेणी** ’ हा लघुकथासंग्रहहि रसिकांच्या मनांची पकड घेऊं शकला.

त्यानंतरच्या दोनअडीच वर्षांत लिहून तयार असलेली ‘ **उपकारी माणसें** ’ ही त्रिखंडात्मक प्रदीर्घ सामाजिक कादंबरी, शेवटीं, १९३८ च्या सुरवातीस प्रसिद्धीस आली. ‘ **प्रवासांतील सोबती** ’ व ‘ **अभ्र-पटल** ’ हे दोन खंड आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. ‘ **आकाश गंगा** ’ हा तृतीय खंड लौकरच बाहेर पडेल.

Jacket Printed at Sagar Sahitya Printing Press, Bombay 4.